साठवीलेवान॥ पैसघातलेंदुकान ॥ १ ॥ जेंज्यापाहि
जेजेकाळीं॥ आहेसिद्धचिजवळी ॥ २॥ नीवडीलेंसा
चें॥ उत्तममध्यमकनिष्ठाचें॥३॥तुकाबैसलादुकानीं॥
दावीमोलाऐसीवाणी॥ ४॥ ॥१२७८॥
अवगुणतोकांहींनाहींप्रतिष्ठीलें ॥ मागेंहोतआलेशि
ष्टाचार ॥ १ ॥ दुर्बळाचेनावेंपीटावाडांगोरा॥ हातोन
व्हेबरासत्यवाद॥ २॥ मद्यआणिमधुयेकरासीनावें॥
तरीतेंकांखावेंआधारेंत्या॥ ३ ॥तुकाह्मणेमाझाउच्छि
ष्टप्रसाद॥ निवडीभेदाभेदव्दष्टिन्यायें॥४॥ ॥१२७९॥
लागलीयामुखस्तना॥ घालीपान्हामाऊली ॥ १ ॥ उ
भयतांआवडीलाडे ॥ कोडेंकोडपुरतसे ॥ २॥ मेळवी
तांअंगेंआंग॥ प्रेमरंगवाढतो ॥ ३ ॥ तुकाह्मणेजडभा
री॥ अवघेंशिरींजननीचे॥ ४॥ ॥१२८०॥
भूतींभगवंत॥ हातोंजाणतोसंकेत॥१॥ मारीमोकली
तोबाण॥ ज्याचात्यासीकळेगुण॥२॥ करावाउपदेश॥
निवडूनितरीदोष॥ ३॥ तुकाह्मणेवाटे ॥ चुकतांआड
रानेंकांटे॥ ४॥ ॥१२८१॥
आह्मांहेंकौतुकजगाद्यावीनीत॥ करावेफजीतचुकती
ते॥ १॥ कासयाचाबाधयेकाच्यानिरोपें ॥ कायव्हावें
कोपेंजगाच्िया ॥ २ ॥ अविद्येचायेथेंकोठेपरिश्रम॥
रामकृष्णनामऐसेबाण ॥ ३ ॥ तुकाह्मणेयेथेखऱ्याचा
वीकरा॥ नसरतीयेराखोट्यापरी॥ ४॥ ॥१२८२॥

दर्पणासीनकटेंलाजे ॥ शुद्धखीजेदेखोनी ॥ १ ॥ ऐसें
अवगुणाच्याबाधें॥ दिसेसुधेंविपरीत॥ २॥ आंधळ्या
सीकायहिरा॥ गाराचीतोसारिखा॥ ३॥ तुकाह्मणेभुंके
सुणे॥ ठायानेणेंठावतो॥ ४॥ ॥ १२८३॥
नावडेतरीकांयेतीलहेभांड ॥ घेउनियांतोंडकाळेंयेथ
॥ १ ॥ नासोनीयांजायरसयासंगती॥ खळाचेपंगती
नारायणा॥ २ ॥ तोंडावाटेनर्ककाढीअमंगळ ॥ मिष्टा
न्नावीटाळकरीसुणें॥ ३ ॥ तुकाह्मणेनाहींसंतांचीमर्या
दा॥ निंद्यतोचिनिंदाशिंदळीचा॥ ४॥ ॥ १२८४॥
लेंकराआईतेपित्याचिजतन ॥ दावीनिजधनसर्वजो
डी॥ १ ॥ तयापरीआमुचाझालासेसांभाळ ॥ देखीला
चिकाळनाहींआड॥ २॥ भूकेचेसन्निधवसेस्तनपान॥
उपायाचीभिन्नचिंतानाहीं॥ ३॥ आळऊनितुकाउभा
पैलथडी॥ घातलीयाउडीपांडुरंगें॥ ४॥ ॥ १२८५॥
शुद्धचर्याहेंचीसंतांचेंपूजन ॥ लागतचीधननाहींवित्त
॥ १ ॥ सगुणाचेसोईसगुणविश्रांती ॥ आपणचियेती
चोजवीत॥ २ ॥ कीर्तनेचीवोळेकृपेचावोरस ॥ दुरीप
णेंवाससन्निधतां॥ ३ ॥ तुकाह्मणेवर्मसांगतोंसवंग॥
मनलावालागस्वहीताचा॥ ४ ॥ ॥ १२८६॥
जीवींचेजाणावेयानावेंआवडी॥ हेकडतेवोढीअमंग
ळ॥ १ ॥ चित्ताच्यासंकोचेंकांहींचनघडे ॥ अतिशयवे
डेचारतेची॥ २ ॥ काळावीणकांहींरुचोंनाहींयेत ॥ क
रूनिसंकेतठेवीयेला ॥ ३ ॥ तुकाह्मणेकळेवचनींचाच

णी॥कायदाउंबोलोनीवेळोवेळां॥४॥ ॥१२८७॥
कामातूरचवीसांडी॥बरळतोंडींबरळे॥ १ ॥ रंगलेंत
अंगींदावी॥विषदेववीआसडें॥२॥धनसोसेंलागेवे
ड॥तेबडबडशमेना॥ ३ ॥ तुकाह्मणेवेसनेंदोन्हीं॥न
रकखाणीभोगावया॥४॥ ॥१२८८॥
कृष्णांजनेंझालेसोज्वळलोचनें ॥ तेणेंदिल्हेवाणनीव
डोनी॥१॥नीरोपाच्यामापेंकरीलडबड॥त्याचेंतेणेंगो
डनारायणे॥ २ ॥भाग्यवंताघरींकरीताविश्वास॥का
यत्यासरीसेंहोईजेतें॥३॥तुकाह्मणेपोटभरेबरेवोजा॥
नीजठावनीजानिजस्थानीं॥४॥ ॥१२८९॥
मैंदआलापंढरीस ॥हातींघेउनिप्रेमपाश॥ १ ॥पुढेंना
डीयेलेंजग ॥ नेतोलागोंनेदीमाग ॥ २॥उभारोनीबा
हे॥दृष्टादृष्टींवेधीताहे ॥ ३ ॥ वैकुंठींहूनिपेणें॥केलेंपंढ
रीकारणें ॥ ४ ॥ पुंडलीकेंथारा॥देउनिआणिलेंयाचो
रा ॥ ५ ॥ तुकाह्मणेचला ॥ तुह्मीआह्मीधरूंत्याला ॥
॥६॥ ॥१२९०॥
भांडवीमाउलीकवतुकेबाळा ॥ आपणासकळासाक्ष
त्वेंसी ॥ १ ॥ माझीमाझीह्मणेयेकमेकांमारी॥हेतोना
हींदूरीउभयतां ॥ २ ॥ तुझेंथोडेंभातेंमाझेंबहुफार॥छं
दकरकरवादमिथ्या॥३॥तुकाह्मणेतयेठायींआहेवर्म॥
हेचिहोयश्रमनीवारीतो॥४॥ ॥१२९१॥
लटिक्याच्याआशा॥हेतोपडिलोंवोळसा ॥ होऊनियां
दोषा॥पात्रमिथ्याअभीमान॥१॥वरवीउघडलीदृष्टी॥

नाहिंतरीहोतोंकष्टीं ॥ आक्रंदतेस्त्रष्टी ॥ मात्रयाचेष्टानी ॥ २ ॥ मरणाचीनाहींशुद्धी ॥ लोभींप्रवर्तलीबुद्धि ॥ परतीतोकधीं ॥ घडेचिनामाघारी ॥ ३ ॥ सांचवुनिमरे धन ॥ लावीपोरासींभांडण ॥ नाहींनारायण ॥ तुकाह्मणेस्मरीयेंला ॥ ४ ॥ ॥ १२९२ ॥

जवळीमुखापासीं ॥ असतांनेघेअहर्निशी ॥ १ ॥ भवनिर्दाळणनाम ॥ विठ्ठलविठ्ठलनाशीकाम ॥ २ ॥ सुखाचेशेजार ॥ करूंकानावडेघर ॥ ३ ॥ तुकाह्मणेठेवा ॥ कांहानकरीचिबरवा ॥ ४ ॥ ॥ १२९३ ॥

बरवेंदेशावरझाले ॥ कायबोलेबोलावे ॥ १ ॥ लाभेलाभदुणावला ॥ जीवघालादर्शनें ॥ २ ॥ भाग्यझालीसंतभेटी ॥ आवडीपोटींहोतीते ॥ ३ ॥ तुकाह्मणेश्रमकेला ॥ अवघाआलाफळासी ॥ ४ ॥ ॥ १२९४ ॥

सांगतांहेंनयेसुख ॥ कीर्तिमुखनपुरे ॥ १ ॥ आवडीनें सेवनकरूं ॥ जीविंचेधरूंजिवींच ॥ २ ॥ उपमायादेतां लाभा ॥ कशाशोभासारिखी ॥ ३ ॥ तुकाह्मणेनुचली डोई ॥ ठेविलीपाईसंतांचे ॥ ४ ॥ ॥ १२९५ ॥

आपुलालालाहोकरूं ॥ केणेभरूंहाविठ्ठल ॥ १ ॥ भाग्यपावलोंयाठाया ॥ आतांकायाकुरवंडी ॥ २ ॥ पुढती कोठेघडेऐसें ॥ बहुतांदीसेफावलें ॥ ३ ॥ तुकाह्मणेझालीजोडी ॥ चरणघडीनवीसंबे ॥ ४ ॥ ॥ १२९६ ॥

उजळलेंभाग्यआतां ॥ अवघींचितावारली ॥ १ ॥ संतदर्शनेंहालाभ ॥ पद्मनाभजोडला ॥ २ ॥ संपुष्टहेंह्रद

यपेटी ॥ करुनिपोटींसाठऊं ॥ ३ ॥ तुकाह्मणेहोताठेवा ॥
तोयाभावासांपडला ॥ ४ ॥ ॥ १२९७ ॥
आह्मासीआपुलेंनावडेसंचित ॥ चरफडीचित्तकळव
ळ्यानें ॥ १ ॥ नकळतांझालाखोळंबामारगा ॥ जगींझा
लोंजगाबहुरूपी ॥ २ ॥ कळोंआलेंबरेंउघडलेडोळे ॥
कर्णधारमीळेतरीबरें ॥ ३ ॥ तुकाह्मणेव्हालऐकतकरु
णा ॥ तरीनारायणाउडीघाला ॥ ४ ॥ ॥ १२९८ ॥
बरगासाठींखादलेंशेण ॥ मिळतांअन्ननसंडी ॥ १ ॥
फजीततोकेलालाहे ॥ ताडणसाहेगौरव ॥ २ ॥ वोढा
ळाचीवोंगळवोढी ॥ उगीखोडीनवजाय ॥ ३ ॥ तुकाफ
जितकरीबुचा ॥ विसरेकुचाफोडीतेणें ॥ ४ ॥ १२९९ ॥
धांवघालीआई ॥ आतांपाहातेसीकाई ॥ १ ॥ धीरना
हींमाझेपोटीं ॥ झालोंवीयोगेंहिंपुटी ॥ २ ॥ करावेंशीत
ळ ॥ बहुझालीतळमळ ॥ ३ ॥ तुकाह्मणेडोई ॥ कधींठे
वीनमीपाई ॥ ४ ॥ ॥ १३०० ॥
तुह्माठावाहोतादेवा ॥ माझेअंतरींचाहेवा ॥ १ ॥ होती
काशानेंसुटका ॥ तरीहेवैकुंठनायका ॥ २ ॥ नसतेंसां
भाळीलें ॥ जरीतुह्मीआश्वासिलें ॥ ३ ॥ तुकाह्मणेरूपा
ळुवा ॥ बरवाकेलासावाधांवा ॥ ४ ॥ ॥ १३०१ ॥
देऊंतेउपमा ॥ आवडीनेंपुरुषोत्तमा ॥ १ ॥ पाहातांक
शातूंसारिखा ॥ तीहींलोकांच्याजनका ॥ २ ॥ अरुपहे
वाणी ॥ गोडकरुनिघेतांकानी ॥ ३ ॥ आवडीनेंखेळे ॥
तुकाफुकाचेसोहळे ॥ ४ ॥ ॥ १३०२ ॥

दर्शनाचीआस॥ आतांनसाहेउदास ॥ १ ॥ जीवआलापायांपासीं॥ येथेअसेकलेवरेसीं॥ २ ॥ कांहींचनाठवे॥ ठाईंबैसलेनूठवे॥ ३ ॥ जीवअसतांपाहीं॥ तुकाठकावलाठाईं॥ ४॥ ॥१३०३॥

भोगावरीआह्मीघातलापाषाण॥ मरणामरणआणियेलें॥ १॥विश्वतूंव्यापककायमीनिराळा॥ कशासाठींबळायेऊंआतां॥ २॥ कायसारूनियांकाढावेंबाहेरी॥ आणूनिभीतरीकायठेऊं ॥ ३ ॥ केलातरीउरेशीणचिकोरडा॥ बळेंघ्यावीपीडास्वपनींची॥ ४॥ अवघेंचिवाणआलेतुह्माघरा॥ मजूरीमजुरारोजकीर्दी ॥ ५ ॥ तुकाह्मणेकांहींनेणेलाभहाणी॥ असेलतोधणीराखोवाडा॥ ६॥ ॥१३०४॥

कांहोयेथेकाळआलाआह्माआड ॥ तुह्मापाशींनाडकरावया ॥ १ ॥ अहोविचाराचेंपडीलेंसांकडें॥ कायऐसेंकोडेंउपजलें॥ २॥ कांहोउपजेनाद्यावीऐसीभेटी॥ कायद्वैतपोटींधरिलेंदेवा ॥ ३ ॥ पापफारकिंवाझालासीदुर्बळ॥ मागीलतेंबळनाहींआतां॥ ४ ॥ कायझालेंदेणेंनीघालेंदिवाळें॥ किंबांधलासीबळेंरूणेंपाईं॥५॥ तुकाह्मणेकांरेऐसीकेलिगोवी ॥ तुझीमाझीठेवींनीवडुनियां॥ ६॥ ॥१३०५॥

कायदेहघालूंकर्वतिकर्मरीं॥टाकुनियांभीतरीअग्नीमाजी ॥ १ ॥ कायसेऊंवनशीतउष्णताहान ॥ साहोकिंवामौनधरुनीबैसों॥ २ ॥ कायलाऊंअंगींभस्मउधळ

ण॥ हिंडोंदेशकोणखुंटचारी ॥ ३ ॥ कायत्यजूंअन्नक रूंउपवास॥ कायकरूंनाशजीविताचा ॥ ४ ॥ तुकाह्म णेकायकरावाउपाव ॥ ऐसादेईभावपांडुरंगा ॥ ५ ॥

॥ १३०६ ॥

दंभेंकितीपोटभरेमानीजन ॥ स्वहितकारणनव्हेकांहीं॥ ॥ १ ॥ अंतरतीतुझेपायमजदूरी ॥ धरीतांहेथोरीजाणी वेचि॥ २ ॥ पिंडाच्यापाळणेंधांवतीविकार॥ मजदावे दारमजमाझी ॥ ३ ॥ कैसाकरूंघातआपलाआपण ॥ धरूनिगुमानलोकलाज ॥ ४ ॥ तुकाह्मणेमजदावींतो सोहळा॥ देखेंपायडोळांतुझेदेवा॥ ५ ॥ ॥ १३०७ ॥

धिगजीणेंत्याचास्वामीहिनवर॥ मरणतेबरेंभलेंमग॥ ॥ १ ॥ आईकाजीदेवाऐसीआहेनीत ॥ कायतेंउचित सांभाळावें॥ २ ॥ देशोदेशींधाकजयाच्याउत्तरें॥ तया चेंकुतरेंपरीभलें॥ ३ ॥ तुकाह्मणेहेकांसुचलेंउत्तर॥ जा णोनिअंतरवोळखावें॥ ४ ॥ ॥ १३०८ ॥

आतांगाऊंतुजवोवीयामंगळी ॥ करूंगदारोळीहरीक था॥ १ ॥ होसीनिवारीताआमूचेंसकळ ॥ भयतळमळ पापपुण्यें॥ २ ॥ भोगीलेतेभोगलाऊंतुझेअंगीं॥ अलि प्तयाजगींहोउनिराहों ॥ ३ ॥ तुकाह्मणेआह्मीलाडिकीं लेंकुरें॥ नराहोंअंतरेंपायाबीण॥ ४ ॥ ॥ १३०९ ॥

सर्वसुखेंआजीयेथेचिवोळलीं ॥ संतांचींदेखिलींचर णांबुजें॥ १ ॥ सर्वकाळहोतोंआठवीतमनीं ॥ फिटली तेधणीयेणेंकाळें ॥ २ ॥ तुकाह्मणेवाचाराहीलीकुंठीत॥

पुढेंझालेंचित्तसमाधान ॥ ३ ॥ ॥ १३१० ॥
बिठ्ठलसोयरासज्जनसांगाती ॥ विठ्ठलहाचित्तींबैसला
से ॥ १ ॥ विठ्ठलेंहेंअंगव्यापीलींहिकाया ॥ विठ्ठलहेछा
यामाझीमज ॥ २ ॥ बैसलाविठ्ठलजिव्हेचीयामाथा ॥
नवदेअन्यथाआनढुजें ॥ ३ ॥ सकळइंद्रियांमनयेक
प्रधान ॥ तेंहिकरीध्यानविठोबाचें ॥ ४ ॥ तुकाह्मणेत्या
होविठ्ठलासीआतां ॥ नयेवीसंबतांमाझेंमज ॥ ५ ॥
॥ १३११ ॥
होयेंहोयेंवारकरी ॥ पाहेपाहेरेपंढरी ॥ १ ॥ कायकरावीं
साधनें ॥ फळअवघेंचीयेणें ॥ २ ॥ अभिमाननुरे ॥ को
डाअवघेंचिपुरे ॥ ३ ॥ तुकाह्मणेडोळां ॥ विठोवैसलासां
वळा ॥ ४ ॥ ॥ १३१२ ॥
पंढरीसीजाये ॥ तोवीसरेबापमाये ॥ १ ॥ अवघाहोये
पांडुरंग ॥ राहोधरोनियांअंग ॥ २ ॥ नलगेधनमान ॥
देहभावेउदासीन ॥ ३ ॥ तुकाह्मणेमळ ॥ नाशिताल्का
ळतेंस्थळ ॥ ४ ॥ ॥ १३१३ ॥
बळेंबाव्याल्कारेंसंपादीलेसोंग ॥ नाहींझालात्यागअं
तरींचा ॥ १ ॥ ऐसेंयेतेंनित्यमाझ्याअनुभवा ॥ मनासीं
हाठावासमाचार ॥ २ ॥ जागृतीचानाहींअनुभवस्व
प्नीं ॥ जातोवीसरोनीसकळहि ॥ ३ ॥ प्रपंचाबाहेरीना
हींआलेंचित्त ॥ केलेंकरीनित्यव्यवसाव ॥ ४ ॥ तुका
ह्मणेमजभोरप्याचेपरी ॥ झालेंसोंगवरीआंततैसें ॥ ५ ॥
॥ १३१४ ॥

ह्मणवीतोंदासतेंनाहींकरणी ॥ आंतवरीदोहींभिन्नभा
व ॥ १ ॥ गातोनाचवीतोंदाखवीतोजना ॥ प्रेमनारा
यणानाहींअंगीं ॥ २ ॥ पावीजेतेंवर्मनकळेचिकांहीं ॥
बुडालोंयाडोहींदंभाचीया ॥ ३ ॥ भांडवलकाळेंहातो
हतींनेलें ॥ मापयालागलेंआयुष्यासी ॥ ४ ॥ तुकाह्मणे
बायांगेलोंऐसादीसे ॥ होयीलयाहासेंलौकीकाचें ॥ ५ ॥
॥ १३१५ ॥

नकळेतोकायकरावाउपाय ॥ जेणेराहेभावतुझेपाईं ॥
॥ १ ॥ येबोनीयांवासकरीसीत्दद्यीं ॥ ऐसेंघडेकाईंकास
याने ॥ २ ॥ साचभावेंतुझेंचिंतनमानसीं ॥ राहेहेकरीसी
कैंगादेवा ॥ ३ ॥ लटीकेंहेंमाझेंकरूनीयांदूरी ॥ साचतूं
अंतरींयेउनीराहे ॥ ४ ॥ तुकाह्मणेमजराखावेंपतीता ॥
आपुलीयासत्तापांडुरंगा ॥ ५ ॥ ॥ १३१६ ॥

चिंतिलेंतेंमनिचेंजाणें ॥ पुरवीखुणअंतरींचें ॥ १ ॥ रा
त्रिनकळेदिवसनकळे ॥ अंगींखेळेदैवतहें ॥ २ ॥ नव
सियाचेपुरवीनवस ॥ भोगीत्यासभिन्ननाहीं ॥ ३ ॥ तु
काह्मणेसमचीदेणें ॥ समचरणींउभाअसे ॥ ४ ॥
॥ १३१७ ॥

उद्धाराचासंदेहनाहीं ॥ याच्याकांहींसेवका ॥ १ ॥ पां
डुरंगअभीमानी ॥ जीवदानीकोवसा ॥ २ ॥ बुडताज
ळींजळतांआगीं ॥ प्रेमसंगींराखावें ॥ ३ ॥ तुकाह्मणे
आह्मासाठीं ॥ रूपापोटींवागवी ॥ ४ ॥ ॥ १३१८ ॥

कायविरक्तीनकळेतेआह्मां ॥ जाणोंयेकानामावीठो
बाच्या॥१॥ नाचोंसुखेंवैष्णवमेळीं॥टाळघोळींआनं
दें॥२॥शांतिक्षमादयामीकायजाणें॥गोविंदकीर्तनें
वाचोनीयां ॥३॥ कासयायेकांतसेऊंतयावना॥आ
नंदतोजनामाजीअसे॥४॥कासयाउदासअसोदेहा
वरी॥अमृतसागरींबुडोनियां॥५॥तुकाह्मणेआह्माऐ
साभरवसा ॥विठ्ठलसरिसाचालतसे॥६॥ १३१९॥
जेथेंवैष्णवांचावास ॥ धन्यभूमीपुण्यदेश ॥ १॥ दोष
नाहींवोखदासी ॥ दूतसांगेयमापासी ॥ २ ॥ गरुडट
कयांच्याभारें ॥भूमिगर्जेजयजयकारें॥३॥ सहजत
याजनाछंद ॥ वाचेगोविंदगोविंद॥४॥तुळसीवनेंरं
गमाळा॥अवघावैकुंठसोहळा॥५॥तुकाह्मणेभेणे॥
काळनयेतेणेंरानें ॥ ६॥ ॥१३२०॥
माझ्याविठोबाचाकैसाप्रेमभाव ॥ आपणचिदेवहोय
गुरु॥१॥पढियेदेहेभावपुरवीवासना॥अंतींतेआपणा
पासींन्यावें ॥ २॥ मागेंपुढेंऊभाराहेसांभाळीत॥आ
लीयाआघातनीवारावे॥३॥योगक्षेमत्याचेंजाणेज
डभारी॥वाटदावीकरींधरूनियां॥४॥तुकाह्मणेनाहीं
विश्वासन्यामनीं ॥ पाहावेंपुराणींवीचारोनी॥५॥
॥१३२१॥
सकळधर्ममजविठोबाचेंनाम ॥ आणीकतेंवर्मनेणे
कांहीं॥१॥कायजाणोसंतांनीरवीलेंदेवें ॥ करितांया
भावेंकृपामज॥२॥ तुकाह्मणेमाझाकोणअधिकार॥

तोमजविचारकळोंयावा ॥ ३ ॥ ॥ १३२२ ॥
उदंडशाहाणेहोतेतर्कवंत ॥ परीनेणवेअंतवीठोबाचा ॥ १ ॥ उदंडअक्षराकरीतभरोवरी ॥ परीनेणवेथोरीविठोबाची ॥ २ ॥ उदंडकुशळहोतीबहुपरी ॥ नेणवेचिथोरीविठोबाची ॥ ३ ॥ तुकाह्मणेनाहींभोळेपणावीण ॥ जाणीवतोशीणरींतेंमाप ॥ ४ ॥ ॥ १३२३ ॥
आधारावांचोनी ॥ कायसांगसीकाहाणी ॥ १ ॥ ठावानाहींपंढरिराव ॥ तोवरिआवघेचीवाव ॥ २ ॥ मानिताहेकोण ॥ तुझेंकोरडेंब्रह्मज्ञान ॥ ३ ॥ तुकाह्मणेठेवा ॥ जाणपणयेकसेवा ॥ ४ ॥ ॥ १३२४ ॥
मजसंतांचाआधार ॥ तूंयेकलेंनिर्विकार ॥ १ ॥ पाहाविचारूनिदेवा ॥ नकोआह्मासवेंदावा ॥ २ ॥ तुजबोलनबोलावे ॥ आह्माभांडायाचीसवे ॥ ३ ॥ तुकाह्मणेतरी ॥ ऐक्यभावेंनूरेउरी ॥ ४ ॥ ॥ १३२५ ॥
अनाथाचीतुह्मादया ॥ पंढरिरायायेतसे ॥ १ ॥ ऐसिऐकोनियांकीर्ती ॥ बहुविश्रांतींपावलों ॥ २ ॥ अनाथाच्याधांवाघरा ॥ नामेंकराकुडावा ॥ ३ ॥ तुकाह्मणेसवघडहित ॥ ठेउनिचित्तपायापें ॥ ४ ॥ ॥ १३२६ ॥
येथेनाहींउरोंआलेअवतार ॥ येरतोपामरजीवकीती ॥ १ ॥ विषयाचिझणीव्हालललोलंगत ॥ चेवलीयाअंतनलगेमग ॥ २ ॥ वाहोनियांभारकुंथसीलवोझें ॥ नव्हेतेचीमाझेंथीतांत्याग ॥ ३ ॥ तुकाह्मणेकैसीनाहींत्याचीलाज ॥ संतींकेशीराजसाधियेला ॥ ४ ॥ ॥ १३२७ ॥

हींचत्याचींपंचभूतें ॥ जीवनभातेप्रेमाचें ॥ १ ॥ कळ
वळाधरिलासंतीं ॥ तोनिगुतीकैवाड ॥ २ ॥ हाचिकाळ
वर्तमान ॥ साधनहीसंपती ॥ ३ ॥ तुकाह्मणेदिवसरा
ती ॥ हेचिखातीअन्नातें ॥ ४ ॥ ॥ १३२८ ॥
दीपनदेखेअंधारा ॥ हेचिकराजतन ॥ १ ॥ नारायणना
रायण ॥ गाठींधनबळकट ॥ २ ॥ चिंतामणीपाशींचिं
ता ॥ तत्वतांहीनयेल ॥ ३ ॥ तुकाह्मणेउभयलोकीं ॥ हे
चिनीकीसामग्री ॥ ॥ ४ ॥ ॥ १३२९ ॥
धन्यकाळसंतभेटी ॥ पाईंमीठीपडलीतों ॥ १ ॥ संदेहा
चीसुटलीगांठी ॥ झालेपोटींशीतळ ॥ २ ॥ भवनदीचा
झालातारा ॥ याउत्तराप्रसादें ॥ ३ ॥ तुकाह्मणेमंगळ
आतां ॥ कोणदातायाहूनी ॥ ४ ॥ ॥ १३३० ॥
दिनरजनीहाचिधंदा ॥ गोविंदाचेपवाडे ॥ १ ॥ संकल्पी
लादेहदेवा ॥ सकळहेवातेठाईं ॥ २ ॥ नाहींअवसान
घडी ॥ सकळजोडीइंद्रियां ॥ ३ ॥ कीर्तिमुखेंगर्जेतुका ॥
करीलोकांसावध ॥ ४ ॥ ॥ १३३१ ॥
खरेंनामंवटनिक्षेपीचेंजूनें ॥ काढीलेंठेवणेंसमर्थांचें ॥
॥ १ ॥ मजुराचेहातेंमापाचाउकाल ॥ मीतोयेथेंफोल
सत्तात्याची ॥ २ ॥ कुलालाचेहातेंघटाचीउत्पत्ती ॥ पा
ठवील्याजातीपाकस्थळा ॥ ३ ॥ तुकाह्मणेजीवनतेंना
रायणी ॥ प्रभाजातेकणींप्रकाशाची ॥ ४ ॥ १३३२ ॥
गंगेचियेअंतेवीणकायचाड ॥ आपुलेंतेंकोडत्रषेपा
शीं ॥ १ ॥ विठ्ठलहेमूर्तीसाजीरीसुंदर ॥ घालूंनिरंतरदृ

दयपूटीं ॥ २॥ कारणतेंअसेनवनीतापाशीं ॥ गावाळ
तेसोशीयेरकोण ॥ ३ ॥ बाळाचेसोईतेघांसघालीमा
ता॥ आटहासचित्तानाहींतया॥ ४ ॥ गाऊंनाचूंकरूं
आनंदसोहळा॥भावचिवेगळानाहींआतां॥५॥तुका
ह्मणेअवघेंझालेंयेकमय ॥ परलोकींचिकायचाडआ
तां॥६॥ ॥१३३३॥

स्त्रीपुत्रादीकींराहीलाआदर॥ वीषईंपडीभरअतिशय
॥ १ ॥ आतांसोडवणेंधांवानारायणा ॥ मजहेवास
नाअनावर ॥ २ ॥ येवोनियांआडठाकेलोकलाज॥
तेंहेदिसेकाजअंतरलें ॥ ३ ॥ तुकाह्मणेआह्माजेथेंजे
थेंगोवा॥तेथेंतुह्मीदेवासांभाळावें॥४॥ ॥१३३४॥

पडिलोंभोवणी ॥होतांबहुचिंतवणी॥ १ ॥होतोंचुक
लोंमारग॥लाहोकेलालागवेग ॥२॥इंद्रियांचेसंधीं॥
होतोंसांपडलोंबंदी॥३॥तुकाह्मणेबरेंझालें ॥ विठ्ठल
सेंवाचेआलें ॥४॥ ॥१३३५॥

बरेंझालेंआलीज्याचीत्याच्याघरा॥ चुकलापाहारावो
ढाळाचा॥१ ॥ बहुकेलेंदुःखीत्याचियेसांभाळें ॥ आ
तांतोंडकाळेंतेणेलोभें ॥ २ ॥ त्याचियाअन्यायेंभोगा
माझें अंग॥सकळहिलागघ्यावालागे॥ ३ ॥ नाहींको
ठेस्थिरराहोंदिल्हेंक्षण ॥ आजीवरीशीणपावलोंतो॥
॥४ ॥वेगळाल्याखोडीकेल्यातडातोडी ॥ सांगावया
घडीनाहींसुख॥ ५ ॥ नीरउनितूकाचालीलागोवार॥
देवापाशींभारसांडऊनी॥ ६॥ ॥१३३६॥

नकरावीआतांपोटासाठींचिंता॥ आहेत्यासंचितामा
पलाऊं॥ १ ॥ दृष्टीतेघालावीपरमार्थाठायीं ॥ क्षुल्लका
उपाईंशीणझाला॥ २॥ तेथेतवनाहींघेईजेसेसवें॥कां
हींनयेजीवेंवेंचोमिथ्या॥ ३ ॥ खंडणचीनव्हेउद्योगवे
रझारी ॥ बापूडेंसंसारींसदांआसो॥ ४ ॥ शेवटापाव
वीनावेचेंबैसणें ॥भुजाबळेंकोणेंकष्टीव्हावें ॥ ५ ॥ तु
काह्मणेआतांसकळाचेंसार ॥ करावाव्यापारतरींऐ
सा॥६॥ ॥१३३७॥
आमुच्याहेंआलेंभागा॥जिव्हारयाजगाचे ॥ १ ॥ध
रोनियांठिलोंजीवें॥बळकटभावेंयेकविध ॥ २ ॥ आ
णुनिकेलारूपा॥उभासोपाजवळी॥ ३॥ तुकाह्मणेअं
कितकेला॥खालींआलावचनें॥ ४॥ ॥१३३८॥
खरेंभांडवलसांपडलेंगांठीं ॥ जेणेनयेतूटीउदीमासी॥
॥ १॥सवंगाचेंकेणेसांपडलेंधरीं ॥भरोनीवैखरीमाप
केलें॥ २॥देतांघेतांलाभहोतसेसकळा॥सदैवदुर्बळा
भावतैसा॥ ३॥ फडाआलीयातोनवजेनीरास ॥जरी
कांहींत्यासनकळतां॥ ४॥ तुकाह्मणेआतांझालिसेनि
श्चिंती॥आणीकतेचित्तींनधरूंदुजें॥५॥ ॥१३३९॥
पदोपदींदिल्हेंअंग॥झालेंसांगकारण ॥ १ ॥ धरुधरु
निठेलोंठाव॥जागावावसकळ ॥ २ ॥ पुढतिचालीम
नालाहो॥वाढेदेहोसंतोषें॥ ३॥ तुकाह्मणेक्षरभागीं॥
झालोंजगींव्यापक॥ ४॥ ॥१३४०॥
नीवडुनिदिल्हेंनवनीत ॥ संचिततेंभोगीतें ॥ १ ॥ आ

तांपुढेंभावसार॥ जीवनाथारपाहावया॥ २॥ पारखि
याचेपडीलोंहातीं॥ चाचपतीआंधळीं॥ ३॥ तुकाह्मणे
सेवनघडे॥ त्यासिजोडेलाभहा॥ ४॥ ॥ १३४१॥
उचितनकळेंइंद्रियाच्यावोढी॥ मुखेंबडबडीशीकलेते
॥ १॥ आपणजाऊनन्यावेंनरकास॥ बळेंबेताळीसकु
ळेंजग॥ २॥ अबोलणेबोलेडोळेझांकोनियां॥ बडब
डीवायादंभासाठीं॥ ३॥ तुकाह्मणेआह्मीतेथीलपार
खी॥ नाचोंदेखोंवेखीजाणोखरें॥ ४॥ ॥ १३४२॥
येकमनतुझ्याअवघ्याभांडवला॥ वाटीतांतेंतुलायेइल
कैंसें॥ १॥ ह्मणवोनिदृढधरींपांडुरंग॥ देहालागिसंग
प्रारब्धाचा॥ २॥ आणिकासंकल्पानकोगोऊंमन॥ तरी
चकारणसाध्यहोय॥ ३॥ तुकाह्मणेऐसेंजाणावेंउचि
त॥ तरीसहजस्थितयेईलकळों॥ ४॥ ॥ १३४३॥
गावेंह्मणवोनीगीत॥ धरुनिराहेतैसेंचित्त॥ १॥ हेंचि
थोरअवघडआहे॥ अन्नदेखोनिभूकराहे॥ २॥ ऐका
वीह्मणुंकथा॥ राहेतैसेंधरुनिचित्ता॥ ३॥ तुकाह्मणेध
णी॥ नव्हेजेवील्यावाचुनी॥ ४॥ ॥ १३४४॥
कळेलहेखुण॥ तरिदावीनारायण॥ १॥ सत्यसंतापा
सीराहे॥ येरादंभआडआहे॥ २॥ अनुचितयाऐसें॥
असेभरलेंप्रकाशें॥ ३॥ इंद्रियांचेधणी॥ तेहेजातीस
मजूनि॥ ४॥ तर्ककुतर्कवाटा॥ नागवणघटापटा॥ ५॥
तुकाह्मणेत्याचें॥ डोळांअंजनबरवें॥ ६॥ ॥ १३४५॥
जातोनयेतियावाटा॥ कायनिरवितोकरंटा॥ १॥ कै

साझालासेबेशरम॥ लाजनाहींनह्मणेराम ॥ २ ॥ पा
हेवैरियाकडे॥ डोळेवांसोनियांरडे॥ ३ ॥ बांधोनियाय
माहातीं॥ दिल्हेंनाहींत्याचीखंती ॥ ४ ॥ नाहींयापेंका
म ॥ ऐसेंजाणतोआधम ॥ ५ ॥ आझुनितरीमुका॥
कांरेजालासीह्मणेतुका॥ ६ ॥ ॥ १३४६॥
वांटाघेईलवकरी ॥ मागेंअंतरतीदुरी ॥ केलिभरोव
री ॥ सारनेतीआणीक ॥ १ ॥ ऐसींभांबावलींकिती ॥
कायजाणोनेणोकिती ॥ समयोनेणति ॥ माथाभार
वाहोनी ॥ २ ॥ नाहींसरलेंतोंवरी ॥ धांवघेईवेगकरीं॥
घेतलेपदरीं ॥ फावलेतेआपुले ॥ ३ ॥ फटलंडिह्मणेतु
का॥ येकनसाहावेधका॥ तरीचयासुखा ॥ मगकैसा
पावसी॥ ४ ॥ ॥ १३४७॥
चालावापंथतोपावीजेत्याठाया ॥ आईकिल्यावाया
वारतात्या॥ १ ॥ आईकाजीवोजेपडतसेपाया ॥ भावा
चितेजायावाटनव्हे॥ २ ॥ व्यालीकुमारीच्याअनुभवेंअ
नुभव॥ सांगतांतोभावयेतनाहीं॥ ३ ॥ तुकाह्मणेयेथेंपा
हिजेअरालें॥ बिंबनिवळलेंतरीभासे॥ ४ ॥ ॥ १३४८॥
कायनाहींलबतझाडें॥ विसरेवेडेंदेहभाव ॥ १ ॥ जया
नफळेउपदेश॥ धसऐसेत्यानावें ॥ २ ॥ कायनांहिआ
सजड॥ दगडतोअबोलणा ॥ ३ ॥ तुकाह्मणेंकुचरदा
णा॥ तैसाह्मणाडेंगहा॥ ४ ॥ ॥ १३४९॥
देखीचादिमाखशीकोनियांदावी ॥ हिच्याऐशिकेवी
गारगोटी॥ १ ॥ मर्यादातेजाणेअरेअभागीया ॥ देवा

च्याऐशियासकळमूर्ती ॥ २ ॥ कायपडिलेसीलटिक्या चेभरी ॥ वोवाळुनिथोरीपरतीसांडी ॥ ३ ॥ तुकाह्मणे पुढेंदिसतसेघात ॥ करीतोफजितह्मणऊनी ॥ ४ ॥

॥ १३५० ॥

संसाराच्यामाथाभार ॥ कांहींपरनठेवी ॥ १ ॥ भक्ति चितेजातीऐसी ॥ सर्वस्वासिमुकावें ॥ २ ॥ भिक्षाआ णिवेवसाव ॥ कालाकरीतोगाढव ॥ ३ ॥ करुनिवस्ति बाजारीं ॥ ह्मणविकासयानिस्पृही ॥ ४ ॥ प्रसादाआडु निकवी ॥ केलेंतुपपाणीतेवी ॥ ५ ॥ तुकाह्मणेहोईशूर ॥ किंवानिसूरमजूर ॥ ६ ॥ ॥ १३५१ ॥

तेजाविसरती ॥ तंटाफोकवरीघेती ॥ १ ॥ कायसांगा वेंत्याहूनी ॥ आइकारेधरामनीं ॥ २ ॥ नव्हेभांडखोर ॥ वोढुनिधरूंपदर ॥ ३ ॥ तुकाह्मणेतोंड ॥ काळेंकराखालीं मुंड ॥ ४ ॥ ॥ १३५२ ॥

मागेंसंतींहोतेंजेंजेंसांगितलें ॥ तेंयेऊंलागलेंअनुभवा ॥ १ ॥ आचारतेभ्रष्टहोतीलोककलीं ॥ पुण्यक्षीणबळी झालेंपाप ॥ २ ॥ वर्णधर्मकोणीनधरितीविटाळ ॥ घा लीतीगोंधळयेकेठायीं ॥ ३ ॥ वेदाचेपाठकसेवीतील मद्य ॥ नदेखतीभेदविषईभांड ॥ ४ ॥ तुकाह्मणेकिती करावेफजीत ॥ तेंचिछंदनित्यबहुहोती ॥ ५ ॥ १३५३ ॥

अक्षराचाश्रमकेला ॥ फळाआलातेणेंतो ॥ १ ॥ अव घीयातळधरी ॥ जीवाउरिनुरऊनी ॥ २ ॥ फळलेंतेंलवे

भारें ॥ पीकबरें आलेंतई ॥ ३ ॥ तुकाह्मणे हागे देवा ॥ पुढें
भेवसारावा ॥ ४ ॥ ॥ १३५४ ॥
उचितजाणावे मुख्यधर्म आधी ॥ चित्तशुद्धबुद्धीठाईं
स्थीर ॥ १ ॥ नघालावीधांवमनाचियेवोढी ॥ वचनीं
आवडीसंतांचिया ॥ २ ॥ अंतरींयाराहेवचनाचावि
श्वास ॥ नलगेउपदेशतुकाह्मणे ॥ ३ ॥ ॥ १३५५ ॥
जीवन्मुक्तज्ञानिजरिझालेपावन ॥ त्यजाहोदुर्जनसंग
तीही ॥ १ ॥ बहुतअन्नविषमोहोरीच्यामानें ॥ अवघें
चितेणेंविषहोय ॥ २ ॥ तुकाह्मणेजेणें आपुलेंस्वहित ॥
तैशीकरीनीतवीचारूनी ॥ ३ ॥ ॥ १३५६ ॥
द्रव्याचातोआह्मीधरीतोंविटाळ ॥ तयापाठीकाळला
गकरी ॥ १ ॥ करूनियांहेंचिराहिलेजीवन ॥ येकनाराय
णनामऐसें ॥ २ ॥ तुकाह्मणेहेंचिकरोनिजतन ॥ आ
लियाहीदानयाचकासी ॥ ३ ॥ ॥ १३५७ ॥
द्रव्याचियामागेंकळीकाळाचालाग ॥ ह्मणोनियांसं
गखोटात्याचा ॥ १ ॥ निरयाचेंमूळघालोनीयांमागें ॥
मांडिलीप्रसंगेंकथापुढें ॥ २ ॥ आजीच्याप्रसंगेंहाचीला
भघ्यावा ॥ पुढिलभारदेवावरींघाला ॥ ३ ॥ प्रारब्धहें
कांहींनपालटेसोसें ॥ तृष्णेंचेंहेंपीसेंवायावीण ॥ ४ ॥ तु
काह्मणेघेईराहेऐसेंधन ॥ सादरश्रवणकरोनियां ॥ ५ ॥
॥ १३५८ ॥
रडेअळंकारदैन्याचीयेकांतीं ॥ उत्तमविपत्तीसंगघडे ॥
॥ १ ॥ येकावीणयेकआशाभेदातारा ॥ कृपेच्यासाग

रापांडुरंगा ॥ २॥ रांधूनेणेंतयापुढील आईतें ॥ केलेंतेंसो
इतेंवायांजाय ॥ ३ ॥ तुकाह्मणेचिंतामणीशेळिगळा ॥
पावे अवकळाह्मणऊनी ॥ ४ ॥ ॥ १३५९ ॥
दुःखाचेडोंगरलागतीसोसावे ॥ ऐसेंतवठावेंसकळांसी
॥ १ ॥ कांहींनकरीतांविचारहिताचा ॥ नकरितीवाचा
नामघोष ॥ २॥ भोगेंकळोंयेतीमागीलतेजन्म ॥ उत्तम
मध्यमकनिष्ठते ॥ ३ ॥ तुकाह्मणेयेथेंझांकितीलडोळे ॥
भोगदेतेवेळेयेइलकळों ॥ ४ ॥ ॥ १३६० ॥
सदैवतुह्माअवघेंआहे ॥ हातपायचालावया ॥ १ ॥ मु
खिंवाणीकानींकीर्ती ॥ डोळेमूर्तिदेखावया ॥ २ ॥ अं
धबहिरठाकिलींकिती ॥ मुकींहोतीपांगुळें ॥ ३ ॥ घरा
आगीलाउनिजागा ॥ नपळेतोगावांचेना ॥ ४ ॥ तुका
ह्मणेजागाहिता ॥ कांहींआतां आपुलिया ॥ ५ ॥ १३६१ ॥
ऐसेपुढतीमिळतीआतां ॥ नाहींसत्तास्वतंत्र ॥ १ ॥ ह्मणु
निफावलेंतेंध्यावें ॥ नामगावेंआवडी ॥ २ ॥ संचित
प्रारब्धगाढें ॥ धांवेपुढेंक्रियमाण ॥ ३ ॥ तुकाह्मणेघुबडा
ऐसें ॥ जन्मसरिसेंसूकराचें ॥ ४ ॥ ॥ १३६२ ॥
सर्वविशींमाझात्रासलासेजीव ॥ आतांकोणभावनि
वडूंयेक ॥ १ ॥ संसाराचीमजनसाहेचिवार्ता ॥ आणि
कह्मणतांमाझेकोण्ही ॥ २ ॥ देहसुखकांहींबोलिलेउप
च्यार ॥ वीषतेंआदरवंधवाटे ॥ ३ ॥ उपाधिदाटणीप्रति
ष्ठागौरव ॥ होयमाझाजीवकासावीस ॥ ४ ॥ तुकाह्मणे

कांहींआणिकनसाहे ॥ आवडतीपायवैष्णवांचे ॥५॥
॥ १३६३ ॥
आणिककांहींयाउत्तराचेंकाज ॥ नाहींआतांमजबो
लावया ॥१॥ भिन्नभेददेहभावनास्वभाव ॥ नव्हेकांहीं
देवयेकवीध ॥२॥ गुणदोषकोणेंनिवडावेधर्म ॥ कोण
जाणेकर्मअकर्मतें ॥ ३ ॥ तरीचभलेआतांनकरावासं
ग ॥ दुःखाचेप्रसंगतोडावया ॥ ४ ॥ तुकाह्मणेगुणगा
ईंयादेवाचे ॥ घेईंमाझेवाचेहेचीधणी ॥ ५ ॥ १३६४ ॥
आपुल्याविचारकरिनजीवासी ॥ काययाजनासीचा
डमज ॥१ ॥ आपुलेंस्वहितजाणतीसकळ ॥ निरोधीतां
बळदुःखवाटे ॥ २ ॥ आईकोनाईकोकथाकोणीतरी ॥
जावोनियांघरींनिजोसुखें ॥ ३ ॥ माझीकोणवोजझा
लाहाशेवट ॥ देखोनियांवाटआणिकालागे ॥ ४ ॥ तु
काह्मणेभाकूंआपुलीकरुणा ॥ जयाचीवासनातया
फळे ॥ ५ ॥
॥ १३६५ ॥
धाईअंतरीच्यासुखें ॥ कायबडबडवाचामुखें ॥ १ ॥ वि
धिनिषेधउरफोडी ॥ जवनाहींअनुभवगोडी ॥ २ ॥ वा
टेतळमळउभयतां ॥ नाहींदेखीलेंअनुभवितां ॥ ३ ॥
आपुलाल्यामतेंपीसें ॥ परितेंआहेजैसेंतैसें ॥ ४ ॥ सा
धनाचीसिद्धी ॥ मौनकरास्थीरबुद्धी ॥ ५ ॥ तुकाह्मणे
वादें ॥ वायांगेलींब्रह्मवृंदें ॥ ६ ॥
॥ १३६६ ॥
कुशळगुंतलेनिषेधा ॥ वादिप्रवर्तलेवादा ॥ १ ॥ कैसि
ठकलीबापुडी ॥ दंभविषयाचीसांकडी ॥ २ ॥ भुसउ

फणुनकेलेंकाय॥हरपलेदोनीठाय॥ ३ ॥तुकाह्मणेला
गेहाता॥कायमथिलेंघुसळितां॥४॥ ॥१३६७॥
संतांचींउच्छिष्टेंबोलतोंउत्तरें ॥ कायम्यागव्हारेंजाणा
वेंहें॥ १ ॥विठ्ठलाचेंनामघेतांनयेशुद्ध ॥ तेथेमजबोध
कायकळे॥ २ ॥करीतोंकवित्वबोबड्याउत्तरीं ॥ ह्मणी
मजवरींकोपधरा ॥ ३ ॥ कायमाझीयातिनेणाहावि
चार ॥कायमीतेंफारबोलोंनेणें ॥ ४ ॥ तुकाह्मणेमज
बोलवीतोदेव॥ अर्थगुह्यभावतोचीजाणे ॥ ५ ॥
॥१३६८॥
चंदनाच्यावासेंधरीतीलनाक॥नावडेकनकनघडेहें ॥
॥ १ ॥साखरेचीगोडीसारखीसकळां॥थोरामोठ्याबा
ळांधाकूटीया॥ २ ॥तुकाह्मणेमाझेंचित्तशुद्धहोतें ॥ त
रीकांनिंदीतेंजनमज॥ ३॥ ॥१३६९॥
तुजऐसीकोणउदाराचिराशी ॥ आपुलेंचिदेशीपददा
सां ॥ १ ॥ शुद्धहिनकांहींनपाहसीकूळ ॥करिसीनिर्म
ळवासदेहीं ॥ २ ॥ भावेंहिकदान्नखासीत्याचेघरीं ॥
अभक्तांच्यापरीनावडती ॥ ३॥नवजासीतेथेंदूरिदव
डीतां॥नयेसिजोचित्तायोगीयांच्या ॥ ४ ॥तुकाह्मणे
ऐशींतुझीब्रीदेंखरीं॥ बोलतीलचारीवेदमुखें॥५॥
॥१३७०॥
तरिकींनेणतेहोतेमागेंऋषी॥तिहींयाजनासींदूराविलें
॥१॥वोळंगतिजयाअष्टमहासिद्धी॥तेयाजनबुद्धीना
तळती॥२॥कंदमूळेंपाल्माधातुच्यापोषणें॥खातिवास

रानांतरीकिला ॥ ३ ॥ लाउनियांनेत्रउगेचिबैसले ॥
नबोलतठेलेमौनमुद्रे ॥ ४ ॥ तुकाह्मणेऐसेंकरींमाझ्या
चित्ता ॥ दुर्‍हावीअनंताजनदूरी ॥ ५ ॥ ॥ १३७१ ॥
कोणाच्याआधारेंकरूंमीविचार ॥ कोणदेइलधीरमा
झ्याजीवा ॥ १ ॥ शास्त्रज्ञपंडितनव्हेमीवाचक ॥ याति
शुद्धयेकठावनाहीं ॥ २ ॥ कलियुगींबहुकुशलहेजन ॥
छळतीलगूणतुझेगातां ॥ ३ ॥ मजहासंदेहझालादोहिं
सवा ॥ भजनकरूंदेवाकिंवानको ॥ ४ ॥ तुकाह्मणेआ
तांदुरावीतांजन ॥ किंवाहेंमरणभलेंदोन्ही ॥ ५ ॥
॥ १३७२ ॥
कायउणेझालेंतुजसमर्थासी ॥ ऐसामजपासींकोण
दोष ॥ १ ॥ जोतुंमाझानकरिसीअंगीकार ॥ सांगेनवे
व्हारसंतांमध्यें ॥ २ ॥ तुजवीणरतआणीकाचेंठाईं ॥ ऐ
सिकोणगोहीदावींमज ॥ ३ ॥ तुकाह्मणेकायधरुनि
गुमान ॥ सांगउगऊनपांडुरंगा ॥ ४ ॥ ॥ १३७३ ॥
कायकरूंअनदैवतें ॥ येकावीणपंढरिनाथें ॥ १ ॥ सर
तामिळालीसागरीं ॥ आणिकानाबाकैचीउरी ॥ २ ॥
अनेकदीपींचाप्रकाश ॥ सूर्यऊगवतांनाश ॥ ३ ॥ तु
काह्मणेनेणेंदुजें ॥ येकावीणपंढरिराजें ॥ ४ ॥ १३७४ ॥
कायकरूंकर्माकर्म ॥ बरेंसांपडलेंवर्म ॥ १ ॥ होसिना
माचीसारिखा ॥ समजाविलीनाहींलेखा ॥ २ ॥ ना
हींवेंचावेंचझाला ॥ उरलाआहेसीसंचला ॥ ३ ॥ तुकाह्म
णेमाझें ॥ कायहोइलतुझावोझें ॥ ४ ॥ ॥ १३७५ ॥

येयायेकींहातोफळी॥ठायाबळीपावले॥ १ ॥ आह्मी
देवाशक्तिहीन ॥ भाकूंतेणेंकरुणा॥ २ ॥ पावठणीके
लाकाळ॥जयाबळहोतेंते॥३॥तुकाह्मणेवीर्यावीर॥
संतधीरसमुद्र॥४॥ ॥१३७६॥
पुढिलाचेंइछीफळ॥नाहींबळतेंअंगीं॥ १ ॥ संतगेले
तयाठायां॥देवरायापाववी ॥ २ ॥जेष्ठाचीकांआह्मा
जोडी॥परवडीनलाभो॥ ३ ॥ तुकाह्मणेकरीकोड॥पुर
विलाडआमुचा ॥ ४ ॥ ॥१३७७॥
कैवल्याच्यातुह्माघरीं ॥राशिहारिउदंड॥ १ ॥ मजसा
ठींकांजीवाणी॥ नहोधणीविभागा॥ २ ॥ सर्वांगुणी
सपुरता ॥ऐसापीताअसोनी ॥ ३ ॥ तुकाह्मणेपांडुरं
गा॥झालोंसांगासन्मुख॥४॥ ॥१३७८॥
आपुलाल्यातुह्मीरूपासींसमजा॥कासयावरजाआर
सीया॥ १ ॥हेंतोंनव्हेदेहबुद्धीचेंकारण॥ होइलनाराय
णेंदानकेलें॥ २॥बंधुचीयाबाणेंवर्मासीस्पर्शावें॥हेतों
नाहींठावेंमोकलीत्या॥ ३ ॥ तुकाह्मणेबहुमुखयावच
ना॥सत्यावीणजाणाचालीनाहीं ॥४॥ ॥१३७९॥
नमानावीचिंतातुह्मांसंतजनीं ॥ हिरास्फटिकमणीके
वीहोय॥ १ ॥पडिलाप्रसंगस्थळात्यासारिखा ॥ देखि
लापारखाभावकांहीं ॥ २ ॥ बहुतांसीभययेकाचीये
दंडें॥ बहुतांयातोंडेंवचनासी॥ ३ ॥ तुकाह्मणेनाहींवै
खरीवासर॥करायाचेचारवेडेवेडे॥ ४॥ ॥१३८०॥
यथाविधिपूजाकरी॥सामग्रीतोंवरिहेनाहीं॥ १ ॥ आ

तांमाझासर्वभार ॥ तूंदातारचालविता ॥ २ ॥ मंग
ळतेआह्मीजाणों ॥ नारायणाकायते ॥ ३ ॥ तुकाह्मणे
समर्पिला ॥ तुजविठ्ठलादेहभाव ॥ ४ ॥ ॥ १३८१ ॥
भवसिंधुचेंहेंचितारूं ॥ मजवीचारुपाहतां ॥ १ ॥ चि
त्तींतुझेधरिनपाय ॥ सुखकायतेंतेथे ॥ २ ॥ माझ्या
खुणामनापासीं ॥ तेयारसींबुडाले ॥ ३ ॥ तुकाह्मणे
वर्मआलें ॥ हाताभलेंहेंचीमाझ्या ॥ ४ ॥ ॥ १३८२ ॥
पाहतांश्रीमुखसुखावलेसुख ॥ डोळियांचीभूकनवजे
माझ्या ॥ १ ॥ जिव्हेगोडीतीनअक्षरांचारस ॥ अमृतज
यासफिकेंपुढें ॥ २ ॥ श्रवणींचिवाटचोखाळीलीशुद्ध ॥
गेलेभेदाभेदवीरोनीयां ॥ ३ ॥ महामळेंमनहोतेंजेंगा
दलें ॥ शुद्धचोखाळीलेंस्फटिकजैसें ॥ ४ ॥ तुकाह्मणे
माझ्याजीवींचेंजीवन ॥ विठ्ठलनिधानसांपडलें ॥ ५ ॥
॥ १३८३ ॥
हाचिपरमानंदआळंगीनबाही ॥ क्षेमदेतांठाईंद्वैततूटे ॥
॥ १ ॥ बोलायाचीमातमननीवेहर्षे ॥ द्रुणिवाढेप्रीतप्रे
मसुख ॥ २ ॥ जनांतभूषणवैकुंठींसरिता ॥ फावलेंस्वहि
तासर्वभावें ॥ ३ ॥ तुटलावेव्हारमायालोकाच्यार ॥ स
मूळसंसारपारुषला ॥ ४ ॥ तुकाह्मणेतोह्याविठ्ठलची
व्हावा ॥ आणिकयाजीवाचाडनाहीं ॥ ५ ॥ १३८४ ॥
आमचीकृपाळूतूंहोसीमाऊली ॥ विठ्ठलेसाऊलिशर
णागता ॥ १ ॥ प्रेमपानास्तनींसदासर्वकाळ ॥ दृष्टीहेनिर्म
ळअमृताची ॥ २ ॥ भूकतानदुःखवाटोंनेदिशीण ॥ अं

तरींचागूणजाणोनियां ॥ ३ ॥ आशातृष्णामायाचिं
तादवडींदूरि ॥ ठावआह्माकरींखेळावया ॥ ४ ॥ तुका
ह्मणेलावींसंताच्यासांगात ॥ जेथेनपवेघातकळिका
ळाचा ॥ ५ ॥ ॥ १३८५ ॥

जेथेजावेंतेथेकपाळसरीसें ॥ लाभतोवीशेषसंतसंगे ॥
॥ १ ॥ पूर्वपुण्येंजरीहोतीसानकूळें ॥ अंतरयामूळेंनुप
जेयेथे ॥ २ ॥ भाग्यतरीनव्हेधनपुत्रदारा ॥ निकटवास
बरासंतांपाईं ॥ ३ ॥ तुकाह्मणेहेंचिकरावीमीरासी ॥ ब
ळीसंतांपासींद्यावाजीव ॥ ४ ॥ ॥ १३८६ ॥

आतांकांहींसोसनकरीं आणीक ॥ धरीनतेंयेकहेंची ॥
दृढ ॥ १ ॥ जेणेंभवसिंधुउतरीजेपार ॥ तुटेहादुस्तरगर्भ
वास ॥ २ ॥ जोडीनतेआतांदेवाचेचरण ॥ अविनाश
धनपरमार्थ ॥ ३ ॥ तुकाह्मणेबराजोडलाहादेह ॥ मनुष्य
पणइहलोकाआलें ॥ ४ ॥ ॥ १३८७ ॥

जतनकरिनजीवें ॥ शुद्धभावेंकरोनी ॥ १ ॥ विठ्ठलवि
ठ्ठलहेंधन ॥ जीवनअंतकाळींचें ॥ २ ॥ वरदळहेंसंचित
सारूं ॥ बरवाकरूंउदीमहा ॥ ३ ॥ तुकाह्मणेहृदयपेटी ॥
येसंपुटींसांठऊं ॥ ४ ॥ ॥ १३८८ ॥

येवढाप्रभुभावें ॥ तेणेंसंपुष्टींराहावें ॥ १ ॥ मागेतुळसी
दळपाणी ॥ येवढातोजगदानी ॥ २ ॥ होयभक्तीकेला
तैसा ॥ पुरवीधरावीतेइच्छा ॥ ३ ॥ आलानावरूपा ॥
तुकाह्मणेझालासोपा ॥ ४ ॥ ॥ १३८९ ॥

भाग्येंऐसीझालीजोडी॥ आतांघडीनविसंबे॥ १॥ वि
टेवरीसमचरण॥ संतींखूणसांगीतली॥ २॥ अवघें
आतांकामसारूं॥ हाचिकरूंकैवाड॥ ३॥ तुकाम्हणे
खंडूंखेपा॥ पुढेंपापापुण्याच्या॥ ४॥ ॥ १३९०॥
पतिव्रतेजैसाभ्रतारप्रमाण॥ आह्मानारायणतैशापरी॥ १॥ सर्वभावेंलोभ्याआवडतेंधन॥ आह्मानारायणतैशापरी॥ २॥ तुकाह्मणेयेकवीधझालेंमन॥ विठ्ठलावांचूननेणेदूजें॥ ३॥ ॥ १३९१॥
विठ्ठलगीतींगावाविठ्ठलचित्तींध्यावा॥ विठ्ठलउभापाहावाविटेवरी॥ १॥ अनाथाचाबंधुविठ्ठलकृपासिंधु॥ तोडीभवबंधुयमपाश॥ २ तोचिशरणागताविठ्ठलमुक्तिदाता॥ विठ्ठलयासंतांसमागमें॥ ३॥ विठ्ठलगुणनीधीविठ्ठलसर्वसिद्धी॥ लागलीसमाधिविठ्ठलनामीं॥ ४॥ विठ्ठलाचेंनामघेतांझालेंसुख॥ गोडावलेंमुखतुकाह्मणे॥ ५॥ ॥ १३९२॥
विठोसांपडावयाहातीं॥ ठावीझालीयेकगती॥ नधरिभयचित्तीं॥ बळकितीतयाचें॥ १॥ लागेआपणचीहातीं॥ कीवभाकावीकाकुळती॥ करिमगचित्तीं॥ असेलतेंतयाचें॥ २॥ येकलीयाभावबळें॥ कैंसांपडेतोकाळें॥ वैष्णवाचेमेळे॥ उभाठाकेहाकेशी॥ ३॥ बांधामाझीयाजीवाशी॥ तुकाह्मणेप्रेमपाशीं॥ नसोडीतयासी॥ सर्वस्वासीउदार॥ ४॥ ॥ १३९३॥
वाटवैकुंठींपाहती॥ भक्तकैंपायेथेंयेती॥ तयांजन्ममर

णखंती ॥ नाहींचित्तींपरलोक ॥ १ ॥ धन्यधन्यहरिचे
दास ॥ तयांसुलभगर्भवास ॥ ब्रह्मादिककरितीआस ॥
तीर्थवासभेटीची ॥ २ ॥ कथाश्रवणव्हावयास ॥ यम
धर्मथोरीआस ॥ पाहेरात्रदिवस ॥ वाटकरजोडोनि
यां ॥ ३ ॥ ऋद्धिसिद्धीनपाच्यारितां ॥ त्याधुंडितिहरीभ
क्तां ॥ मोक्षेसायोज्यता ॥ वाटपाहातीभक्तांची ॥ ४ ॥
असतीजेथेंउभेठेले ॥ सदाप्रेमसुखेंधाले ॥ आणिकहि
उद्धरिले ॥ महादोषीचांडाळ ॥ ५ ॥ सकळकरितीज्या
चीआस ॥ सर्वभावेंतेउदास ॥ धन्यभाग्यत्यांस ॥ तु
काह्मणेदरुशनें ॥ ६ ॥ ॥ १३९४ ॥
सोनेदावीवरींतांबेंतयापोटीं ॥ खरीयाचेसाठींवीकूंपा
हे ॥ १ ॥ पारखीतोजाणेंतयाचेजीवीचें ॥ निवडीदोहीं
चेंवेगळालें ॥ २ ॥ क्षीरानीराकैसेहोययेकपण ॥ स्वादी
तोचीभिन्नभिन्नकाढी ॥ ३ ॥ तुकाह्मणेथीताआपण
चिखोटा ॥ अपमानमोठापाववीला ॥ ४ ॥ १३९५ ॥
फोडोनिसांगडीबांधीलीमाजासी ॥ पैलथडीकैसीपा
वेलसहज ॥ १ ॥ आपलातोघातआपणचिकरीं ॥ आ
णिकसांगतांतरीनायकेचि ॥ २ ॥ भुकेभेणेवीषदेऊंपाहे
आतां ॥ आपुल्याचीघाताकरूंपाहे ॥ ३ ॥ तुकाह्मणेये
कचालतीलपूढें ॥ तयासिवांकडेंजातांठके ॥ ४ ॥ १३९६
उपकारासाठींबोलोंहेउपाय ॥ येणेंवीणकायेआह्माचा
ड ॥ १ ॥ बुडतांहेजननदेखवेडोळां ॥ येतोकळवळाह्म
णुनीयां ॥ २ ॥ तुकाह्मणेमाझेदेखतीलडोळे ॥ भोगदे

तवेळेयेइलकळों॥ ३॥ ॥१३९७॥
आठवेदेवतोकरावाउपाव॥येरत्यजीवावखटपट॥१॥
होईरेबाजागाहोईरेबाजागा॥वाउगारेकांगाशीणशी
ल॥२॥जाणिवेच्याभारेंभवाचीयाढोहीं॥बुडशीतोकां
हींनिघशीना॥ ३॥ तुकाह्मणेदेवापावसीलभावें॥ जा
णतातेंठावेंकांहींनव्हे॥ ४॥ ॥१३९८॥
माझ्यामुखावाटेनयोहेंवचन ॥ व्हावेंहसंतानद्रव्यको
णा ॥१ ॥सुखाचाविभागपतनदुःखासी ॥ दोहिंमुळें
त्यासीतेंचीसाध्य ॥ २ ॥ नायकावीनिंदास्तुतिमाझ्या
कानें ॥ सादरयामनेंहोऊनीयां॥ ३॥ तुकाह्मणेदेवअ
साध्ययामूळें ॥ आशामोहजाळेंगुंतलीया ॥ ४ ॥
॥१३९९॥
चित्तग्वाहीतेथेलौकीकाचेंकाई ॥ स्वहितातेठाईआप
णापें॥ १॥ मनासीविचारतोचीसाचभाव ॥ व्यापला
हादेव अंतर्बाही ॥ २ ॥ शुद्धभावनलगेसुचावापरिहा
र॥ उमटेसाचारआणिकेठाईं॥ ३॥ भोगीत्यासिकाज
अंतरींचीगोडी॥ बाहिरल्याचाडनाहींरंगें ॥ ४ ॥तुका
ह्मणेभावशुद्धहेंकारण ॥ भाटनारायणहोईलत्याचा॥
॥ ५ ॥ ॥१४००॥
नव्हतीमाझेबोल ॥ अवघेकरीतोविठ्ठल॥ १ ॥ कांहींन
धरावीखंती ॥हितहोईलधराचित्तीं ॥ २ ॥ खोटीतेअ
हंता ॥ वाटटाकीलीसांगतां ॥ ज्याचेंतोचीजाणें ॥
मीमापाडेंतुकाह्मणे॥ ४॥ ॥ १४०१॥

वासनेचेमुखीं आदळूनिभितें ॥ निर्वाहापूरतेंकारणनें ॥ १ ॥ यानावअंतराआलानारायण ॥ चित्तसमाधा नखुणत्याची ॥ २ ॥ सर्वकाळहाचीकरणेंविचार॥ वि वेकींसादरआत्मत्वाचे ॥ ३ ॥ तुकाह्मणेंजोंजोंभजना सीवळे॥ अंगींतोंतोंकळेसन्निधता॥४॥ ॥१४०२॥
चिंतनेंअचिंतराहिलोंनिश्चळ ॥ तेचिकितीकाळवाढ वावें॥ १ ॥ अबोल्याचाकाळआतांऐशावरी॥ वचना सींऊरिउरलीनाहीं॥ २॥ कसाअलातोतोंकिलालवला हो॥ ऊरोंचसंदेहोदीलानाहीं ॥ ३ ॥ तुकाह्मणेमोहपर तेचिनामागें ॥ ह्मणोनीयांत्यागेंत्यागझाला ॥ ४ ॥ ॥१४०३॥
निर्गुणासीद्यावेंगुणासीदर्शन ॥ येकायेकींभिन्नभेदघ डे॥ १ ॥ तुह्माआह्माआतांनपडोंयावरी॥ अहोंतेच्चिब रीजेथेंतेथें ॥ २॥ आपणापासूनिनसावेंअंतर॥ वेची लेंउत्तरह्मणऊनी ॥ ३ ॥ तुकाह्मणेअंगाआलीकठीण ता॥ अमूच्याअनंतातुह्माऐशी॥४॥ ॥१४०४॥
तुजचीपासावझालोंसेनिर्माण ॥ असावेंतेभिन्नंकास यानें ॥ १ ॥ पाहावाजीठाईंकरूनिविच्यार॥ न्यूनकोठें फारअसेचीना॥ २॥ ठेवियेलेठाईआज्ञेचेंपाळण॥ क रोनीजतनराहीलोंसें ॥ ३ ॥ तुकाह्मणेआतांबोलतसें स्पष्ट॥ झालोक्रियानष्टतुह्माऐसा॥४॥ ॥१४०५॥
प्रीतिभंगमाझाकेलापांडुरंगा ॥ भक्तीरससांगाकांजी तुह्मी ॥ १ ॥ ह्मणऊनिकांहींनठेवीचिऊरी ॥ आलोंव

मांवरीयेकायेकीं ॥ २ ॥ नदेखोंचिकांहींपरतोंमाघारी ॥
उरलीतिउरीनाहींमूळी ॥ ३ ॥ तुकाह्मणेआलाअंतरा
चीखंड ॥ तरीमाझेंतोंडखवळीलें ॥ ४ ॥ ॥ १४०६ ॥
लटीकादेवह्मणतांऐसा ॥ संदेहसाबाटतसे ॥ १ ॥ ऐसे
आलेंअनुभवा ॥ मजहिसेवाकरितां ॥ २ ॥ शून्याका
रीबहुमोळा ॥ भेंडोळाहेपवाडे ॥ ३ ॥ तुकाह्मणेताळी
नाहीं ॥ येकेठायींचपळत्वें ॥ ४ ॥ ॥ १४०७ ॥
जैशासाठीतैसेंव्हावें ॥ हेंबरवेंकळतसे ॥ १ ॥ उदासतूं
नारायणा ॥ मीहिह्मणातुह्मीच ॥ २ ॥ ठकामाहाठकाजो
डा ॥ जोधडफुडालागासी ॥ ३ ॥ येकांगींचभांडितुका ॥
नाहींधोकाजीवित्वें ॥ ४ ॥ ॥ १४०८ ॥
बहुतारीतिकाकूळती ॥ आलोंचित्तींनधराच ॥ १ ॥
आतांकशासाठींदेवा ॥ मिथ्याहेवावाढऊं ॥ २ ॥ तु
ह्माआह्माझालीतुटी ॥ आतांभेटीचिंतनें ॥ ३ ॥ तुकाह्म
णेलाजीरवाणें ॥ अंधजीणेंइच्छेचें ॥ ४ ॥ ॥ १४०९ ॥
आश्चर्यतेंयेकझालें ॥ मनाआलेंमाझीया ॥ १ ॥ मढ्या
पासींकरुणाकेली ॥ तैसीगेलीव्यथाहे ॥ २ ॥ नयावातो
कैसाराग ॥ खोटेंमगदेखोनि ॥ ३ ॥ तुकाह्मणेकैचाबो
ला ॥ शोधविठ्ठलामाझीया ॥ ४ ॥ ॥ १४१० ॥
मागायाचीनाहींइच्छा ॥ जोमीऐसासंकोचें ॥ १ ॥ ल
टिकीयाचीनकरूंस्तुति ॥ इच्छाचित्तींधरूनी ॥ २ ॥ हि
शोबेंतेंआलेंघ्यावें ॥ हेंतोठावेंसकळांसी ॥ ३ ॥ तुकाह्म
णेस्वामीसेवा ॥ येथेंदेवाकशाची ॥ ४ ॥ ॥ १४११ ॥

पाठवणेंपडणेंपायां ॥ उद्धारवायांकशाचा ॥ १ ॥ घड
लेंतेंभेटीसवें ॥ दिसेलबरवेंसकळा ॥ २ ॥ नघडतांदृष्टा
दृष्टी ॥ कायगोष्टीकोरड्या ॥ ३ ॥ अबोल्यानेअसेतुका ॥
अंतरयेकासाक्षीते ॥ ४ ॥ ॥ १४१२ ॥
अभयाचेंस्थळ ॥ तेंहेंयेकअचळ ॥ १ ॥ तरीधरिलावि
श्वास ॥ ठेलोंहोऊनियांदास ॥ २ ॥ पुरलीआवडी ॥ पा
ईलागलीसेगोडी ॥ ३ ॥ तुकाह्मणेकंठींनाम ॥ अंगींभ
रलेंसेप्रेम ॥ ४ ॥ ॥ १४१३ ॥
संदेहनिरसेतरीरुचिकर ॥ फिक्यासीआदरचवीनाहीं
॥ १ ॥ आतांनकोमजखोट्यानेंफटऊ ॥ कोठेयेऊंजाऊं
वेळोवेळां ॥ २ ॥ गेलातरीकायजीवाचेंसाकडें ॥ वांच
उनीपूढेंकायकाज ॥ ३ ॥ तुकाह्मणेकसीनीवडाजीवरें ॥
केलितैसींपोरेंआलींपाईं ॥ ४ ॥ ॥ १४१४ ॥
वेदवाणीपरीदुर्लभअनुभवो ॥ चालीचाची वाहोबहु
तेक ॥ १ ॥ आह्मींऐसेकैसेराहावेंनिश्चळ ॥ पाठीलागा
काळजिंतीतसे ॥ २ ॥ वाढवीतांपोटभेदाचेपसारे ॥
येतीलमाघारेमुदलातोटे ॥ ३ ॥ तुकाह्मणेबरेंजांगवी
तामना ॥ तुमच्यानारायणाअभयकरें ॥ ४ ॥ १४१५ ॥
उगेंचिहेंमनराहातेंनिश्चळ ॥ तरीकांतळमळसाटहोती
॥ १ ॥ कायतुमचीनेणोंकौतुकविंदानें ॥ सर्वोत्तमपणें
खेळतसा ॥ २ ॥ नानाछंदेंआह्मानाचवावेंजीवा ॥
वाढवाव्याहावाभलत्यापुढें ॥ ३ ॥ तुकाह्मणेतुह्मीआपु
लीप्रतिष्ठा ॥ वाढवावयाचेष्टाकरीतसा ॥ ४ ॥ १४१६ ॥

आह्मीबळकटजाहलोंफिरोनि ॥ तुमच्यावचनींतुह्मा
गोऊं ॥ १ ॥ झालेंतेंव्हांझालेंमागीलेंतेंमागें ॥ आतां
वर्मलागेठावीझाली ॥ २ ॥ तोडावायाअवघ्याचेष्टा
चासंबंध ॥ शुद्धापासींशुद्धबुद्धव्हावें ॥ ३ ॥ तुकाह्मणे
आह्माआत्मत्वाचीसोय ॥ आपणचीहोयतैसाचीतूं ॥
॥ ४ ॥ ॥ १४१७ ॥
तुह्मीसाचनुपेक्षालहाभरवसा ॥ मजजाणतसाअधी
रसें ॥ १ ॥ कासयाघातलालांबणीउद्धार ॥ ठेवाकरकर
वारूनियां ॥ २ ॥ सुटोंनयेऐसेंकळलेंनिरुतें ॥ काप्यावें
मागूतेंआळऊनी ॥ ३ ॥ तुकाह्मणेतुह्मीसभाग्यजीदे
वा ॥ माझातुह्माकेवाकायआला ॥ ४ ॥ ॥ १४१८ ॥
तुह्माहोईलदेवापडिलावीसर ॥ आह्मीतेंउत्तरयत्नकेले
॥ १ ॥ पतितपावनब्रीदमीरवीसी ॥ याचाकायदेसीझा
डासांग ॥ २ ॥ अहाचमीनव्हेअर्थाचेभुकेले ॥ भलत्याये
काबोलेंवारेनतो ॥ ३ ॥ तुकाह्मणेदेहदेईनसांडणें ॥ स
हितअभिमानेंवोवाळुनी ॥ ४ ॥ ॥ १४१९ ॥
जडलोंअंगअंगीं ॥ मगठेवीप्रसंगीं ॥ कांहींउरीजगीं ॥
लोकींआहेपूरती ॥ १ ॥ ठेविनिवारूनिआधी ॥ अव
काशतोचिबुद्धी ॥ सांपडलोंसंधी ॥ मगबळकोणासी
॥ २ ॥ गळाबांधेंनपाईं ॥ हलोंनदीठाईंच्याठाईं ॥ नी
वाडतोतईं ॥ आवकळाकेलिया ॥ ३ ॥ तुकाह्मणेठावें ॥
आह्माआघातीवरवें ॥ बोभाटाचीसवें ॥ मुळिहूनीवि
ठोबा ॥ ४ ॥ ॥ १४२० ॥

आह्मीशक्तिहीनें॥कैसेंकरालतेंनेणे॥लीगाडाच्यागुणे॥
खोळंबलाराहिलों ॥ १ ॥ माझेंमजदेईदेवा ॥ असेल
तोंठेविलाठेवा॥ नाहींकरीतहेवा॥ कांहींअधिकआग
ळा ॥ २ ॥ नाहींगळापडलोंझोंड ॥ तुमचेतेंचीमाझेंतों
ड ॥ चौघारचारलंड ॥ लांबणीहेअनुचित ॥३॥ नाहींयि
तबळा ॥ आतांतुह्मासीगोपाळा ॥ तुकाह्मणेगळा ॥
उगवापाईलागतों॥४॥ ॥ १४२१ ॥
कायकृपेवीणघालावेंसाकडे ॥निश्चितीनीवाडेकोण्या
येका ॥ १ ॥ आहोंतैसेपुढेंअसोंदीनपणे ॥ वेंचूनीवच
नेकरुणेचीं ॥ २ ॥ धरूनिभयआतांकायवाढूंचिंता॥
कायकरूंआतांआमपण ॥ ३ ॥ तुकाह्मणेआह्मीभाव
हीनजीव॥ह्मणउनीदेवदूरेदूरी॥४॥ ॥१४२२॥
नाहींउलंघीलेंकोणाचेंवचन ॥ मजकांनारायणदुरी
झाला ॥ १ ॥ आशंकितमनेंकरींआळवण ॥ नाहींस
माधाननिश्चितीचें ॥ २ ॥ दासाचावीसरहेंतोंअनुचि
त ॥ असेसर्वनीतपायापासीं ॥ ३ ॥ तुकाह्मणेतुह्मा
लाजयेतनाहीं ॥ आह्माचिंताडोहींबुडवीतां ॥ ४ ॥
॥ १४२३॥
जीवजायवरिसांडीकरीमाता ॥ हेतोआश्चर्यताबाळ
काची॥ १॥दुर्बळाकींनाहींअइकतकानीं॥कायनाराय
णींन्यूनझालें॥२॥ क्षणक्षणामाझानघ्यावासांभाळ॥
अभाग्याचाकाळऐसाआला ॥ ३ ॥ तुकाह्मणेनाहींव

चनासीरुची ॥ फलकटवेचीतेंतेंहोय ॥ ४ ॥ ॥ १४२४ ॥
ह्मणवोनिदासनव्हेंऐसाझालों ॥ अनुभवेंबोलोंस्वामी
पुढें ॥ १ ॥ कांनाहींवचनप्रतिउत्तराचें ॥ मीचमाझ्यावे
चेअट्टाहास्यें ॥ २ ॥ कासयानेंगोडीउपजावाविश्वा
स ॥ प्रीतीकांहींरसवांचुनियां ॥ ३ ॥ तुकाह्मणे अगाचतुर
शिरोमणी ॥ विचारावेंमनींकेशीराजा ॥ ४ ॥ १४२५ ॥
कायआह्मीआतांपोटचीभरावें ॥ जगवाळवावेंभक्त
ह्मणूं ॥ १ ॥ ऐसातरीयेकसांगाजीविचार ॥ बहुहोतों
फारकासावीस ॥ २ ॥ कायकवित्वाचीघालुनियांरूढी ॥
करूंजोडाजोडीअक्षराची ॥ ३ ॥ तुकाह्मणेकाय गुंफोनी
ढुकाना ॥ राहोनारायणाकरुनिघात ॥ ४ ॥ ॥ १४२६ ॥
वर्मतरीअह्मादावा ॥ कायदेवाजाणेमी ॥ १ ॥ बहुता
रंगींहीनझालों ॥ तरीआलोंशरण ॥ २ ॥ द्यालजरीतु
ह्मीधीर ॥ होईलस्थीरमनठाईं ॥ ३ ॥ तुकाह्मणेसत्ताव
ळें ॥ लडीवाळेंराखावीं ॥ ४ ॥ ॥ १४२७ ॥
सांगोंदेवानेणाकाय ॥ बोलाचियेआवडी ॥ १ ॥ वा
यांमजचुकुरेंकरा ॥ विश्वंभरावीनोदें ॥ २ ॥ आवडी
च्याकराऐसे ॥ अंतरवासेंजाणतसा ॥ ३ ॥ तुकाह्मणे
विश्वासावें ॥ प्रेमद्यावेंविठ्ठलें ॥ ४ ॥ ॥ १४२८ ॥
निर्धाराचेंअवघेंगोड ॥ वाटेकोडकौतुक ॥ १ ॥ बैसली
याभावपाईं ॥ बरातईनाचेन ॥ २ ॥ स्वामीकेलेंसावधा
न ॥ परीमनउल्हासे ॥ ३ ॥ तुकाह्मणेविश्वासावें ॥ प्रे
मद्यावेंविठ्ठलें ॥ ४ ॥ ॥ १४२९ ॥

झालीतडातोडी॥ अवघीपडलीउघडी ॥ १ ॥ नव्होको
णाचिचकांहीं॥ तुझेभरलीयावाहीं ॥ २॥ पारुषलासं
वसार॥ मोडलिबैसण्याचीथार॥३॥ आतांह्मणेतुका॥
देवाअंतरराखोंनका॥ ४॥ ॥१४३०॥
आधारतोव्हावा॥ ऐसिआसकरींदेवा ॥ १ ॥ तुह्मापा
सींकायउणे ॥ कायवेंचेसमाधानें ॥ २ ॥ सेवेच्याअ
भिलाषें॥ मनबहुझालेंपिसें॥३॥ अरेभक्तपराधीना॥
तुकाह्मणेनारायणा॥ ४॥ ॥१४३१॥
तुमचातुह्मीकेलागोवा॥ आतांचुकवीतांदेवा॥ १ ॥कै
सेसरेचावळणें॥ केलेंकशालाशाहाणें ॥ २॥ कासया
होरूपा ॥ नावाआलेतीगाबापा ॥ ३॥ तुकाह्मणेआ
तां॥ नसरेहवालेघालितां॥ ४॥ ॥१४३२॥
माझीभक्तीभोळी॥ येकविधभावबळी ॥ १ ॥ मीकांप
डेननीराळा॥ ऐसासांडोनीसोहळा॥ २॥ आतांआना
रीसा॥ येथेंनव्हावेंसहसा ॥ ३ ॥ तुकाह्मणेजोडोनिपा
य॥ पुढेंउगाउभाराहे॥ ४॥ ॥१४३३॥
आहेतरीसत्ता॥ ऐशाकरितोवारता ॥ १ ॥ अंगसंगा
चींउत्तरें॥ सलगिसेवेनेंलेंकरें॥ २॥ तरीनिकटवासें ॥
असोआशंकेच्यानाशें॥ ३ ॥ तुकाह्मणेरुची ॥ येथेंभि
न्नताकइंची॥ ४॥ ॥१४३४॥
काळसारावाचिंतनें॥ येकांतवासीगंगास्नानें॥ देवाचें
पूजन॥प्रदक्षिणातुळशीच्या॥१॥ युक्तआहारविहार॥
नेमइंद्रियांचासार॥ नसावीबासर॥ निद्राबहुभाषण

॥ २ ॥ परमार्थमहाधन ॥ जोडीदेवाचेचरण ॥ व्हावया
जतन ॥ हेउपायलाभाचे ॥ ३ ॥ देहसमर्पीजेदेवा ॥ भा
रकांहींचनघ्यावा ॥ होईलआघवा ॥ तुकाह्मणेआनं
द ॥ ४ ॥ ॥ १४३५ ॥
मउमेणाहुनिआह्मीविष्णुदास ॥ कठीणवज्रासभेदूं
ऐसे ॥ १ ॥ मेलेजितअसोंनिजोनीयांजागे ॥ जोजो
जेंजेंमागेतेंतेंदेऊं ॥ २ ॥ भलेतरीदेऊंगांठीचीलंगो
टी ॥ नाटपाळाचेकाठींदेऊंमाथा ॥ ३ ॥ मायबापाहूनि
बहुमायावंत ॥ करूंघातपातशत्रुहूनी ॥ ४ ॥ अमृततें
कायगोडआह्मापुढें ॥ विषतेंबापुडेंकडूकिती ॥ ५ ॥ तु
काह्मणेआह्मीअवघेचीगोड ॥ जाचेंपुढेंकोडत्याचेप
री ॥ ६ ॥ ॥ १४३६ ॥
गाढवाचेतान्हें ॥ पालटलेंक्षणक्षणे ॥ १ ॥ तैसेअधमा
चेगुण ॥ येकवीधनाहींमन ॥ २ ॥ उपजतांबरेंदीसे ॥ रू
पवाढेतोंतोंनाशे ॥ ३ ॥ तुकाह्मणेभुंकतेवेळे ॥ वेळअवे
ळनकळे ॥ ४ ॥ ॥ १४३७ ॥
विटाळतोपरद्रव्यपरनारी ॥ येथोनिजोदूरीतोसोहळा
॥ १ ॥ गद्यपद्यकांहींनधरावीउपाधी ॥ स्वाधीनचिबुद्धि
करुनीठेवा ॥ २ ॥ विचाराचेंकांहींकरावेंस्वहीत ॥ पाप
पुण्यातीतभांडवल ॥ ३ ॥ तुकाह्मणेनलगेजावेंवनांत
रा ॥ विश्वविश्वंभरासारिखेंची ॥ ४ ॥ ॥ १४३८ ॥
कल्पतरुरुयानव्हतिबाभुळा ॥ पुरवितीफळाइच्छित
या ॥ १ ॥ उदंडत्यागाईह्मैसीआणिशेळ्या ॥ परीत्यानि

राळ्याकामधेनु ॥ २ ॥ तुकाह्मणेदेवदाखवीलदृष्टी ॥ त
यासवेंभेटीथोरपुण्य ॥ ३ ॥ ॥ १४३९ ॥
जळोप्रेमातैसारंग ॥ जायभूलोनिपतंग ॥ १ ॥ सासु
साठींरडेसून ॥ भावअंतरींचाभिन्न ॥ २ ॥ मैंदमुखीं
चाकोवळा ॥ भावअंतरींनिराळा ॥ ३ ॥ जैसीवृंदाव
नकांती ॥ उत्तमधरूनयेहातीं ॥ ४ ॥ बकध्यानधरी ॥ सों
गकरुनिमासेमारी ॥ ५ ॥ तुकाह्मणेसर्पडोले ॥ तैसाकथे
माजीखुले ॥ ६ ॥ ॥ १४४० ॥
वेश्यानाहींबोलअवगुणदुषिले ॥ ऐस्याबोलाभलेह्मणी
क्षोभा ॥ १ ॥ कोणनेणेंअन्नजीवाचेंजीवन ॥ विषमे
ळवणविषहोय ॥ २ ॥ सोनेंशुद्धनेणेंकोणहाविचार ॥
डाकेंहीनवरकेलेंत्यासी ॥ ३ ॥ यातिशुद्धपरीअधमलक्ष
ण ॥ वायांगेलेंतेणेंसोंगहीतें ॥ ४ ॥ तुकाह्मणेशूरतोचि
पावेमान ॥ आणिकमंडणभारवाही ॥ ५ ॥ १४४१ ॥
अणुरेणुयाथोकडा ॥ तुकाआकाशायेवढा ॥ १ ॥ गि
ळुनिसांडिलेंकलेवर ॥ भवभ्रमाचाआकार ॥ २ ॥ सां
डिलीत्रिपुटी ॥ दीपउजळलाघटीं ॥ ३ ॥ तुकाह्मणेआ
तां ॥ उरलोंउपकारापुरता ॥ ४ ॥ ॥ १४४२ ॥
धन्यआजीदिन ॥ झालेंसंतांचेंदर्शन ॥ १ ॥ झालीपापा
तापातुटी ॥ दैन्यगेलेंउठाउठी ॥ २ ॥ झालेंसमाधान ॥
पाईंविसावलेंमन ॥ ३ ॥ तुकाह्मणेआलेघरा ॥ तोचि
दीवाळीदसरा ॥ ४ ॥ ॥ १४४३ ॥
हेंचिमाझेंधन ॥ तुमचेवंदावेचरण ॥ १ ॥ येणेभाग्यअ

सोजित ॥ येवढेंसमर्पुनीचित्त ॥ २ ॥ सांभाळीलेंदेवा ॥ मजअनाथाजीजीवा ॥ ३ ॥ जोडूनीयांकर ॥ तुकाविनवीतोकिंकर ॥ ४ ॥

॥ १४४४ ॥

फजितखोरामनाकितीतूजसांगों ॥ नकोकोणालागोंमागेंमागें ॥ १ ॥ स्नेहवाददुःखजडेलहेंअंगीं ॥ निष्ठुरहेंजगींप्रेमसुख ॥ २ ॥ निंदास्तुतिकोण्हीकरोदयामाया ॥ नधरिचाडयासुखदुःखा ॥ ३ ॥ योगीराजकरिंनराहतींबैसोनी ॥ येकीयेआसनींयाचिगुणें ॥ ४ ॥ तुकाह्मणेमनापाहेंविचारून ॥ होईरेकठिणवज्राऐसें ॥ ५ ॥

॥ १४४५ ॥

जळोमाझीऐसीबुद्धी ॥ मजघालीतुजमधीं ॥ आवडीहेविधी ॥ निषेधींचचांगली ॥ १ ॥ तूंस्वामीमीशेवक ॥ उंचपदयेकनीच ॥ ऐसेंकरावेंकवतुक ॥ नकोकरूंखंडणा ॥ २ ॥ जळनखातीजळा ॥ वृक्षआपूलीयाफळा ॥ भोक्तातोनिराळा ॥ तेणेगोडीनिवडिली ॥ ३ ॥ हिराशोभलाकोंदणें ॥ अलंकारिमिरवीसोनें ॥ येकअसतांतेणें ॥ कायदुजेंजाणावें ॥ ४ ॥ उष्णेछायेसुखवाटे ॥ बाळेंमातापान्हाफुटे ॥ येकायेकभेटे ॥ कोणसुखतेकाळीं ॥ ५ ॥ तुकाह्मणेहित ॥ हेंचिमानीमाझेंचित्त ॥ नव्हेआतांमुक्त ॥ ऐसाआलाभरवसा ॥ ६ ॥ १४४६ ॥

मनींवसेत्याचेंआवडेउत्तर ॥ वाटेसमाचारघ्यावाऐसा ॥ १ ॥ जातीचेतेझुरेयेरयेरासाठीं ॥ वियोगेंहीतुटीनघेकधीं ॥ २ ॥ भेटीचीअपेक्षावारतांआदर ॥ पुसे

नव्हेधीरमागूताले ॥ ३ ॥ तुकाह्मणेमाझ्याजिवाचेंजी
वन ॥ सोइरेहरिजनप्राणसखे ॥ ४ ॥ ॥ १४४७ ॥
नव्हेआराणूकपरिमनींवाहो ॥ होईलत्यासात्यपांडुरं
ग ॥ १ ॥ पंढरिसीजावेंउद्वेगमानसीं ॥ धरिल्यापाव
सीसंदेहनाहीं ॥ २ ॥ नसोबळदेहअसोपराधीन ॥ परिहें
चिंतनटाकोंनको ॥ ३ ॥ तुकाह्मणेदेहपडोयाचिंतनें ॥
पुढेंलागेयेणेयाजसाठीं ॥ ४ ॥ ॥ १४४८ ॥
कोठेंदेवाआलेंअंगाथोरपण ॥ बरेंहोतोदीनलीनतरी
॥ १ ॥ साधनतेंसेवासंतांचीउत्तम ॥ आवडीनेंनामगा
ईजेतें ॥ २ ॥ नपुसेतेकोण्हीकोठहीअसतां ॥ समाधान
चित्ताचियासुखें ॥ ३ ॥ तुकाह्मणेजनअव्हेरीतेंमज ॥
तरिकेशिराजसांभाळीतां ॥ ४ ॥ ॥ १४४९ ॥
चतुरमीझालोंआपुल्याभोंवता ॥ भावेविणरितास्फुंद
अंगीं ॥ १ ॥ आतांपुढेंवायांजावेंहेंतेकाई ॥ कामक्रोधें
ठाईंवासकेला ॥ २ ॥ गुणदोषआलेजगाचेअंतरा ॥ भू
ताच्यामत्सरावरीबुद्धी ॥ ३ ॥ तुकाह्मणेकरूंउपदेशलो
कां ॥ नाहींझालोंयेकादोषापरता ॥ ४ ॥ . ॥ १४५० ॥
धन्यतेसंसारीं ॥ दयावंतजेअंतरीं ॥ १ ॥ येथेउपकारा
साठीं ॥ आलेंघरज्यावैकुंठीं ॥ २ ॥ लटिकेंवचन ॥ नाहीं
देहींउदासीन ॥ ३ ॥ मधुरावाणिहोटीं ॥ तुकाह्मणेवाव
पोटीं ॥ ४ ॥ ॥ १४५१ ॥
कांडिल्याकुटिल्याहोतोमांडा ॥ आळसेंधोंडापडतसे ॥
॥ १ ॥ रागनकोधरूंमनीं ॥ गांठमनींसांगतों ॥ २ ॥ तर

टापुढेंबरेंनाचे ॥ सुतेकांचेंमुसळ ॥ ३ ॥ तुकाह्मणेका
ढीसार ॥ करिफारशाहाणें ॥ ४ ॥ ॥ १४५२ ॥
कळोंयेतेतरिकांनव्हे ॥ पडतिगोवेभ्रमाचे ॥ १ ॥ जाण
तांचिहोतोघात ॥ परिसामातदेवाहे ॥ २ ॥ आविसा
साठींफासामान ॥ पाडीधनइष्टातें ॥ ३ ॥ तुकाह्मणेहो
णारखोटें ॥ कर्ममोठेंबळिवंत ॥ ४ ॥ ॥ १४५३ ॥
मोकळेंमनरसाळवाणी ॥ याचीगुणीसंपन्न ॥ १ ॥ ल
क्ष्मीतेऐशानावें ॥ भाग्यजावेंतरित्यानीं ॥ २ ॥ नमनन
म्रताअंगीं ॥ नेघेरंगींपालट ॥ ३ ॥ तुकाह्मणेत्याच्याना
वें ॥ घेतांव्हावेंसंतोषी ॥ ४ ॥ ॥ १४५४ ॥
शेवटींचीविनवणी ॥ संतजनींपरिसावी ॥ १ ॥ विसरतो
नपडावा ॥ माझादेवातुह्मासी ॥ २ ॥ पुढेंफारबोलों
काई ॥ अवघेपाईंविदित ॥ ३ ॥ तुकाह्मणेपडिलोंपा
या ॥ कराछायाकृपेची ॥ ४ ॥ ॥ १४५५ ॥
करितोंकवित्वह्मणालहेंकोण्ही ॥ नव्हेमाझीवाणीपद
रींची ॥ १ ॥ माझियेंयुक्तीचानव्हेहाप्रकार ॥ मजवि
श्वंभरबोलवीतो ॥ २ ॥ कायमीपामरजाणेअर्थभेद ॥
वदवीगोविंदतेंचिवदें ॥ ३ ॥ निमित्यमापासींबैसवि
लोंआहे ॥ मीतोकांहींनव्हेस्वामीसत्ता ॥ ४ ॥ तुकाह्मणे
आहेपाईंकचिखरा ॥ वागवीतोमुद्रानामाचीहे ॥ ५ ॥
॥ १४५६ ॥
आह्मीगावेतुह्मीकोण्हिकांहींनह्मणावें ॥ ऐसेंतवआ
ह्मासांगीतलेनाहींदेवें ॥ १ ॥ ह्मणारामरामटाळीवा

जवाहातें ॥ नाचाडोलाप्रेमें आपुलीयास्वहितें ॥ २ ॥
सहजघडेतयाआळसकरणेंतेंकाइ ॥ अग्नीचेभातुके
हातपाळितांकापाई ॥ ३ ॥ येथेनाहींलाजभक्तिभाव
लौकीक ॥ हासेतयाघडेब्रह्महत्यापातक ॥ ४ ॥ जया
जैसाभावनिरोपणकरावा ॥ येथेनाहींचाडताळवि
ताळयादेवा ॥ ५ ॥ सदैवज्याकथाकाळघडेश्रवण ॥ तु
काह्मणेयेरजन्माआलेपाषाण ॥ ६ ॥ ॥ १४५७ ॥
देवघ्याकोणीदेवघ्याकोणी ॥ ऐताआलाघरपुसोनी ॥
॥ १ ॥ देवनलगेदेवनलगे ॥ साठवणेचेरुधलेजागे ॥
॥ २ ॥ देवमंदलादेवमंदला ॥ भाववुडालाकायकरूं ॥
॥ ३ ॥ देवघ्याफुकादेवघ्याफुका ॥ नलगेरुकामोलकां
हीं ॥ ४ ॥ दुबळातुकाभावहीन ॥ उधारादेवघेतलाऋणें
॥ ५ ॥ ॥ १४५८ ॥
विष्णुमयजगवैष्णवासीठावें ॥ येरानींवाहावेंभारमा
था ॥ १ ॥ साधनेंसंकटसर्वांलागींशीण ॥ व्हावालागेक्षी
णअहंमान ॥ २ ॥ भावहाकठीणवज्रहेंभेंदावें ॥ परिनछे
दवेमायाजाळ ॥ ३ ॥ तुकाह्मणेवर्मभजनींसांपडे ॥ ये
रासीतोपडेवोसदिशा ॥ ४ ॥ ॥ १४५९ ॥
कीर्तनाचीगोडी ॥ देवनिवडीआपण ॥ १ ॥ कोढीव्हारे
अधीकारी ॥ त्यासिहरिदेईल ॥ २ ॥ वैराग्याचेंबळ ॥
साहिखळजिणावे ॥ ३ ॥ उरेलनाउरी ॥ तुकाकरीबो
भाट ॥ ४ ॥ ॥ १४६० ॥

कायावाचामनठेविलेंगाहाण ॥ घेतलेंतुझेंरिणजोडी लागीं॥ १ ॥ अवघेंआलेंआतांपोटापडिलेंथीतें ॥ सारूनीनिश्चितझालोंदेवा ॥ २ ॥ घावयासीआतांनाहीं तोळामासा॥ आधीलप्रवेशातूजठावे ॥ ३ ॥ तुझ्यारिणेंगेलेबहुतबांधोनीं ॥ झालेमजहूनीथोरथोर ॥ ४ ॥ तुकाह्मणेतुझेखतींजेगुंतले ॥ करूनीआपुलेघेईंदेवा॥ ॥ ५ ॥

॥ १४६१ ॥

आलेंभराकेणें॥ येरझारचुकेजेणें॥ १ ॥ उभेकेलेंविटेवरी॥ पेठइनामपंढरी ॥ २ ॥ वाहातीमारग॥ अवघेंमोहोरलेंजग॥ ३ ॥ तुकाह्मणेमाप ॥ खरेंआणामाझें बाप ॥ ४ ॥

॥ १४६२ ॥

लक्ष्मीवल्लभा ॥ दीनानाथापद्मनाभा॥ १ ॥ सुखवसेतुझेपाईं ॥ मजठेवीतेचिठाईं॥ २ ॥ माझोहेवासना॥ तूंताउदाराचाराणा॥ ३ ॥ तुकाह्मणेभोगें॥ पीडाकेली धांववेगें॥ ४ ॥

॥ १४६३ ॥

करीऐसेजागें ॥ वेळोंवेळांपायांलागें॥ १ ॥ प्रेमझोंबेकंठीं॥ देहधरणीयेलोटी ॥ २ ॥ राहेलोकाचार ॥ पडे अवघाविसर ॥ ३ ॥ तुकाह्मणेध्यावें ॥ तुजव्यभिचारभावें॥ ४ ॥

॥ १४६४ ॥

टाळदिंडीहातीं ॥ वैकुंठीचेतेसांगाती॥ १ ॥ जालतरिकोणीजागा॥ करासिदोरितेवेगा॥ २ ॥ जातीसादावीत॥ तेथअसोंघावेंचित्त॥ ३ ॥ तुकाह्मणेबोल॥ जातिबोलतविठ्ठल॥ ४ ॥

॥ १४६५ ॥

वायांजातोंदेवा ॥ नेणेभक्तिकरूंसेवा ॥ १ ॥ आतांजो
डोनियांहात ॥ उभाराहिलोंनिवांत ॥ २ ॥ करावेंतेंका
य ॥ नकळेअवलोकीतोंपाय ॥ ३ ॥ तुकाह्मणेदान ॥
दिल्हेंपदरींघेईन ॥ ४ ॥ ॥ १४६६ ॥
जिवींचाजिव्हाळा ॥ पाहों आपुलीयाडोळां ॥ १ ॥ आ
ह्माविठ्ठलयेकदेव ॥ येरअवघेचिवाव ॥ २ ॥ पुंडलिका
चेपाठीं ॥ उभाहातठेउनीकटीं ॥ ३ ॥ तुकाह्मणेचित्तीं ॥
वाहूंरखुमाईचापति ॥ ४ ॥ ॥ १४६७ ॥
जीवखादलादैवतें ॥ माझायेणेंमहाभूतें ॥ झोंबलेंनिरु
तें ॥ कांहींकरितांनसुटे ॥ १ ॥ आतांकरूंकाय ॥ नचले
करीतांउपाय ॥ तुह्माआह्मासय ॥ विघडावीकडीकेली
॥ २ ॥ बोलतांदुश्चिती ॥ मीवोपडियेलोंभ्रांती ॥ आ
ठवहाचित्तीं ॥ नयेह्मणतांमीमाझें ॥ ३ ॥ भलतेंचीचा
वळे ॥ जनाअवघियावेगळें ॥ नाठवतीबाळें ॥ आप
परासारिखे ॥ ४ ॥ नकाबोलोंसये ॥ मजवचननसाहे ॥
बैसल्यात्याराहे ॥ उग्यावाचाखुंटोनी ॥ ५ ॥ तुह्माआ
ह्माभेटी ॥ नाहींझालीजिवेसाठीं ॥ तुकाह्मणेदृष्टी ॥ पा
हाजवळीआहेतो ॥ ६ ॥ ॥ १४६८ ॥
माझेंआराधन ॥ पंढरपुरीचेंनिधान ॥ १ ॥ तयायेका
वीणदुजें ॥ कांहींनेणेपंढरिराजे ॥ २ ॥ दासविठ्ठलाचा ॥
अंकितअंकीलाठाईचा ॥ ३ ॥ तुकाह्मणेआतां ॥ नव्हे
पालटसर्वथा ॥ ४ ॥ ॥ १४६९ ॥
आतांआह्माहेंचिकाम ॥ वाचेगाऊंतुझेंनाम ॥ वाढु

नियांटाळीप्रेम ॥ सुखेआनंदेंनाचावें ॥ १ ॥ अवघी
झालीआराणुक॥ मागेंपुढेंसकळिक ॥ त्रिपुटीचेंदुःख॥
प्रारब्धासारिखें॥ २॥ गोदातटींनिर्मळें ॥ देवदेवाचीं
देवळें॥ संतमहंतमेळें ॥ दिवसजायसुखाचा॥ ३॥ तु
काह्मणेपंढरिनाथा ॥ आणिकनाहींमजचिंता॥ योग
क्षेममाथा॥ भारतुझ्याघातला॥ ४॥ ॥१४७०॥

चोरटेंसुनेमारिलेंटाळें॥केउकरिपरीनसांडिचाळे॥१॥
ऐसेयेकदुराच्यारीगादेवा ॥ आपुलीयाजीवाघातक
री ॥ २ ॥ नाकगेलेंतरीलाजनाविचार ॥ हिंडेफजित
खोरदारोदारीं ॥ ३ ॥ तुकाह्मणेकर्मबळिवंतगाढें ॥ ने
दीतयापुढेंमागेंसरों ॥ ४ ॥ ॥ १४७१ ॥

मुनिमुक्तझालेभेणेंगर्भवासा॥ आह्माविष्णुदासांसुल
भतो॥१॥ औघाचीसंसारकेलाब्रह्मरूप॥ विठ्ठलस्वरूप
ह्मणोनीयां॥ २॥ पुराणउपदेशसाधनउद्धट ॥ आह्मा
सोपीवाटवैकुंठीची ॥ ३ ॥ तुकाह्मणेजनासकळासहि
त॥ घेऊंअखंडितप्रेमसुख ॥ ४ ॥ ॥१४७२॥

नकराधीस्तुतिमाझीसंतजनीं ॥ होइलयावचनींअभी
मान॥ १ ॥ भारेंभवनदीनुतरवेपार॥ दुराविबीदूरतु
मचेपाय॥ २॥ तुकाह्मणेगर्वपुरविलपाठी॥ होइलमा
झ्यातुटीविठोबाची ॥ ३ ॥ ॥१४७३॥

तुमचियादासीचादासकरुनिठेवा ॥ आशिर्वादद्यावा
हाचीमज ॥ १ ॥ नवविधाकायबोलिलीजेभक्ती॥ द्या
वीमाझेहातींसंतजनीं ॥ २ ॥ तुकाह्मणेतुमच्यापाया

च्याआधारें॥ उतरेनखरेंभवनदी॥ ३॥ ॥१४७४॥
चोरठकाचेनिघालेचोरी॥ आपलेंतैसेपारिखेघरीं॥१॥
नाहींनाहींनफानागवेआपण॥ गमाविलेकानहातपा
य॥२॥बुद्धिहीननव्हेकांहिंचिकारण॥ तयासवेजाणतें
चिसुख॥ ३॥ तुकाह्मणेनाहींठाउकेंतेधर्म ॥ तयासीतें
कर्मवोढवलें॥ ४॥ ॥१४७५॥
समर्थाचेंबाळकीलवाणेंदिसे॥ तरीकोणाहासेजनदे
वा॥ १॥ अवगुणिजरीझालेंतेंवोंगळ॥ करावासांभा
ळलागेत्याचा॥ २॥ तुकाह्मणेतैसामीयेकपतित॥ दा
समुद्रांकीतझालोंतुझा॥ ३॥ ॥१४७६॥
गाढवाचेअंगींचंदनाचीऊटी॥राखेसवेभेटीतेणेंकेली
॥ १॥ सहजतोगुणजयाचियेदेहीं॥ पालटतोकांहींना
हींतया॥ २॥ माकडाच्यागळांमोलाचातोमणी॥ घा
तलावोऊनींथुंकोनिटाकी॥ ३॥ तुकाह्मणेखळानाव
डेचिहीत॥ अविद्यावाढतआपुलेमतें॥ ४॥ १४७७॥
नेणेसुनेचोरपाहुणामागता॥ देखोनीभलताभुंकतसे
॥ १॥ शिकविलेंकांहींनचलेतेंतया॥ बोलीयेलेवायां
बोलजाती॥ २॥ क्षीरवोकोनीयांखायअमंगळ॥ आ
पुलेतेंढाळजाऊंनेदी॥ ३॥ वंदूंनिंदूंसंतांकायदुराच्या
र॥ खळाचाविचारतुकाह्मणे॥ ४॥ ॥१४७८॥
जनमानवलेवरिंबाह्यात्कारीं॥ तैसामीअंतरींनाहीं
झालों॥ १॥ ह्मणोनिपंढरिनाथावाटतसेंचिंता॥ प्र
गटबोलतांलाजवाटे॥ २॥ संतांब्रह्मरूपझालेअव

घेजन ॥ तेमाझेअवगुणनदेखती ॥ ३ ॥ तुकाह्मणे
मीतोआपणासीठावा॥ आहेंबरादेवाजैसातैसा ॥४॥
॥ १४७९ ॥

कामक्रोधमाझेजिताचिशरीरीं ॥ कोंवळेतेवरीबोलत
से॥१॥कैसासरताझालोंतुमचियेपाईं॥ पांडुरंगाकांहीं
नकळेहे ॥ २ ॥ पुराणीचिगोहीबोलतीलसंत ॥ तैसेंना
हींचित्तशुद्धझालें॥ ३ ॥ तुकाह्मणेमजआणुनीअनुभ
वा॥ दाखवीहेदेवासाचखरें॥ ४ ॥ ॥ १४८० ॥

स्तुतीकरीजैसानाहींअधिकार॥ नकळेवीचारयोग्यते
चा॥ १ ॥ तुमचेमीदाससंताचेदुर्बळ ॥ करूनीसांभाळ
राखापाईं ॥ २ ॥ रामकृष्णहरिमंत्रउच्चारणा ॥ आव
डीचरणाविठोबाच्या ॥ ३ ॥ तुकाह्मणेतुमचेंसेवितोंउ
च्छिष्ट॥ क्षमाकरीधीटहोऊनीयां॥ ४ ॥ ॥ १४८१ ॥

बहुदूरवरि॥ वेठिवोझेंहोतेंशिरीं ॥ १ ॥ आतांउतरला
भार॥ तुह्मीकेलाअंगीकार॥ २॥ बहुकाकुळती ॥ आ
लोंअसेंमागेंकिती॥ ३ ॥ तुकाह्मणेदेवा ॥ आजिसफ
ळझालीसेवा॥ ४ ॥ ॥ १४८२ ॥

पाईक अ० ११.

पाईकपणेंजोकथिलासिद्धांत ॥ शूरधरिमातवचनचि
त्तीं ॥ १ ॥ पाईकीवांचुनीनव्हेकधींसुख ॥ प्रजामध्यें
दुःखनसेरपीडा ॥ २॥ तरिव्हावेंपाईकजीवाचेउदार॥
सकळत्याचाभारस्वामीवाहे॥३॥ पाईकीचेंसुखजया
नाहींठावें ॥ धिगत्यानींजावेंवायांवीण ॥ ४ ॥ तुका

ह्मणेयेकाक्षणाचाकरार ॥ पाईकअपारसुखभोगी ॥
॥५॥ ॥१४८३॥

पाईकीचेंसुखपाईकासीठावें ॥ ह्मणोनीयांजीवेंकेली
साठी ॥ १ ॥ येतांगोळ्याबाणसाहिलेभडिमार ॥ वर्ष
तांअपारवृष्टीवरी ॥ २ ॥ स्वामीपुढेंव्हावेंपडतांभांडण॥
मगत्यामंढणशोभादावी ॥ ३ ॥ पाईकानेंसुखभोगी
लेंअपार ॥ शूरआणिधीरअंतर्बाही ॥ ४॥ तुकाह्मणेया
हीसिद्धांताच्याखुणा ॥ जाणेतोशाहाणाकरिताभोगी
॥५॥ ॥१४८४॥

पाईकतोजाणेपाईकीचाभाव ॥ लागबगठावचोरवा
ट ॥ १ ॥ आपणाराखोनीठकावेंआणीक ॥ घ्यावेसक
ळिकठकोनीयां ॥ २ ॥ येऊंनेदीलागलागोनेदीमाग ॥
पाईकत्याजगस्वामीमानी ॥ ३ ॥ ऐसेजनेकेलेपाईकें
पाईक ॥ जयाकोणिभीकनघालीती ॥ ४ ॥ तुकाह्मणे
ऐसेजयाचेपाईक ॥ बळियातोनाइकत्रैलोकीचा ॥५॥
॥ १४८५॥

पाईकानींपंथचालविल्यावाटा ॥ पारख्याचासाठांमो
डोनीयां ॥ १ ॥ पारखीयेठाईंघेउनीयांखाणे ॥ आपुले
तेजनराखीयेले ॥ २ ॥ आधारेंवीणजेंबोलतांचाव
ळे ॥ आपुलेंतेंकळेनव्हेऐसें ॥ ३ ॥ सांडितांमारगमारि
तीपाईक ॥ आणिकासीसीकलागावया ॥ ४ ॥ तुका
ह्मणेविश्वाघेउनिविश्वास ॥ पाईकतयांससुखदेती ॥
॥५॥ ॥१४८६॥

पाईकतोप्रजाराखोनीयांकूळ ॥ पारखीयामूळछेदीह
ष्टा ॥ १ ॥ तोयेकपाईकपाईकानाईक ॥ भावसकळीक
स्वामीकाजीं॥ २॥ तृणवततनुसोनेंज्यापाषाण॥ पाईक
त्याभिन्ननाहींस्वामी ॥ ३ ॥ विश्वासावांचोनीपाईका
सीमोल ॥ नाहींमिथ्याबोलबोललीया ॥ ४ ॥ तुका
ह्मणेनयेस्वामीउणेपण ॥ पाईकजतनकरित्यासी ॥
॥ ५ ॥

॥ १४८७ ॥

धनीज्यापाईकामानितोआपण ॥ तयाभीतेंजनसक
ळीक ॥ १ ॥ जिवाचेउदारशोभतीपाईक ॥ मीरवति
नाईकमुगुटमणी ॥ २ ॥ आपुलीयासत्तास्वामीचेवै
भव ॥ भोगीतिगौरवसकळसुख ॥ ३ ॥ कमाइची
हिनेपडलींउदंडें ॥ नाहींतयाखंडयेतीजाती ॥ ४ ॥ तु
काह्मणेतरीपाईकीचिभली ॥ थोडिबहुतकेलीस्वामीसे
वा ॥ ५ ॥

॥ १४८८ ॥

पाईकपणेंखरामुशारा ॥ पाईकतोखरापाईकीनें ॥ १ ॥
पाईकतोजाणेमारितेअंग ॥ पाईकासीभंगनाहींतया
॥ २ ॥ येकदोहींघरींघेतलेंखाणें ॥ पाईकतोपणेनिवड
ला ॥ ३ ॥ करूनीकारणस्वामीयशद्यावें ॥ पाईकत्याना
वेंखरेंपण ॥ ४ ॥ तुकाह्मणेठावपाईकानिराळा ॥ ना
हींस्वामीस्थळागेल्याविण ॥ ५ ॥ ॥ १४८९ ॥
उंचनीचकैसीपाईकाचीवोळी ॥ कोणगाढेबळीनीवड
ले ॥ २ ॥ स्वामीकाजीयेकसर्वस्वेंतत्पर ॥ येकतेकुचरआ
शाबद्ध ॥ ३ ॥ प्रसंगावांचूनीआणितिआविर्भाव ॥ पा

इंकतोनावमिरवीवायां ॥ ३ ॥ गणतीचेयेकउंचनीच फार ॥ तयामध्येंसूरविरळाथोडे ॥ ४ ॥ तुकाह्मणेस्वा मीजाणेत्याचामान ॥ पाईकपाहोनमोलकरी ॥ ५ ॥
॥ १४९० ॥

येकाचीस्वामीचेपाईकसकळ ॥ जैसेंतैसेंबळमोलतयां ॥ १ ॥ स्वामीपदींयेकाठावउंचस्थळीं ॥ येकतिनिरा ळीजवळीदुरि ॥ २ ॥ हीनकमाईचाहीनआनठाव ॥ उं चासर्वभावउंचपद ॥ ३ ॥ पाईकपणतोसर्वत्रसरता ॥ चांगातरिपरतागांढ्यावाव ॥ ४ ॥ तुकाह्मणेमरणआ हेयासकळां ॥ भेणेंअवकळाअभयमोल ॥ ५ ॥ १४९१ ॥

प्रजींतोपाईकवोळीचानाईक ॥ पोटासाठींयेकजैसी तैसी ॥ १ ॥ आगळेंपाऊलआणिकासीतारी ॥ पळतां माघारीतोंडिजेती ॥ २ ॥ पाठीवरिघायह्मणतीफटमर ॥ धडाअंगशूरमानपावे ॥ ३ ॥ घेईलदरवडादेहातोपाई क ॥ मारिसकळीकसर्वहरी ॥ ४ ॥ तुकाह्मणेनव्हेबोलाचें कारण ॥ कमाईचापणसिद्धीपावे ॥ ५ ॥ ॥ १४९२ ॥

जातीचापाईकवोळखेपाईका ॥ आदरतोयेकात्याचें ठाईं ॥ १ ॥ धरितीलपोटासाठींहतियारें ॥ कळतितिखे रेंवेठीचींतीं ॥ २ ॥ जातीचेंतेंअसेखरेंघायडाय ॥ पारखी याकायपाशींलोपे ॥ ३ ॥ तुकाह्मणेनमूंदेवह्मणूंजना ॥ झालीयाच्याखुणाजाणतसों ॥ ४ ॥ ॥ १४९३ ॥

बुद्धिचापालटधरारेकांहीं ॥ मागुताहानाहींमनुष्यज

न्म ॥ १ ॥ आपुल्याहिताचेनव्हतिसायास॥गृहदाराआ
सधनवित्त ॥ २ ॥ अवचितनिधानलागलेंसेहातीं ॥ भो
गावीविपत्ती गर्भवास ॥ ३ ॥ यावेंजावेंपुढेंऐसेंचिका
रण ॥ भोगावेंपतननरकवास ॥ ४ ॥ तुकाह्मणेधरीआ
ठवयादेहीं ॥ नाहींतरीकांहींबरेंनव्हे ॥ ५ ॥ ॥ १४९४ ॥
आह्मीपतितानींघालावेंसांकडें ॥ तुह्मालागेकोडेंउग
वणें ॥ १ ॥ आचरतांदोषनधरूंसांभाळ ॥ निवाडऊक
ळतुह्माहातीं ॥ २ ॥ नघेतांकवडीकरावाकुढावा ॥ पा
चारितांदेवानामासाठीं ॥ ३ ॥ दयासिंधुनामपतितपा
वन ॥ हेंआह्मावचनसांपडलें ॥ ४ ॥ तुकाह्मणेकरूंअ
न्यायाच्याकोटी ॥ रूपावंतपोटींतूंचिदेवा ॥ ५ ॥
॥ १४९५ ॥
जोभक्तांचाविसावा ॥ उभापाचारितोधांवा ॥ १ ॥
हातीप्रेमाचेंभातुकें ॥ मुखींघालीकवतुकें ॥ २ ॥ भव
सिंधुसुखें ॥ उतरिकासेलाउनिनिकें ॥ ३ ॥ थोरभक्तिची
आस ॥ पाहेभोंवतालीवास ॥ ४ ॥ तुकाह्मणेरूपादा
नी ॥ फेडिआवडीचीधणी ॥ ५ ॥ ॥ १४९६ ॥
अखंडतुझीजयाप्रीति ॥ मजदेतयाचीसंगती ॥ मगमी
कमळापति ॥ तुजबानाणीकंटाळा ॥ १ ॥ पडोनराहि
नतयेठांई ॥ उगाचिसंतांचीयेपाईं ॥ नमागेंनकरीकांहीं ॥
तुझीआणगाविठोबा ॥ २ ॥ तुह्मीआह्मीपीडोंजेणें ॥ दो
निवारतीयेकानें ॥ बैसलोंधरणें ॥ हाकादेतदारेसी ॥ ३ ॥
तुकाह्मणेयाबोला ॥ चित्तद्यावेंबाविठ्ठला ॥ नपाहीजेके

ला॥ औघामाझाअव्हेरु॥ ४॥ ॥१४९७॥
पुनितकेलेंविष्णुदासीं ॥ संगेंआपुलीयादोषी ॥ १ ॥ कोणपाहेतयांकडे॥ वीरविठ्ठलावेगाढे ॥ २ ॥ अशुभ त्यांपुढें ॥ शुभहोऊनियांठाके ॥ ३ ॥ प्रेमसुखाचिया राशी॥ पापनाहींवोखदासी ॥ ४ ॥ तुकाह्मणेत्यांनीं ॥ केलीवैकुंठमेदिनी॥ ५॥ ॥१४९८॥
जनदेवतरिपायांचीपडावें॥ त्याचीयास्वभावेचाडनाहीं ॥ १ ॥ अग्निचेंसौजन्यशीतनिवारण॥ पालवीबांधोननेतांनये ॥ २ ॥ तुकाह्मणेविंचूसर्पनारायण॥ वंदावेदुरूनसिवोंनये॥ ३॥ ॥१४९९॥
भूतभविष्यकळोंयेईलवर्तमान ॥ हेंतोभाग्यहीनत्याचीजोडी॥ १॥ आह्मीविष्णुदासींदेवध्यावाचित्तें ॥ होणारतेंहोतेंप्रारब्धेंची॥ २ ॥ जगरूढिसाठींघातलेंदुकान ॥ जातोनारायणअंतरोनी ॥ ३ ॥ तुकाह्मणेहाहाप्रपंचतोगाढा ॥ थोरलीतीपीडारिद्धिसीद्धि ॥ ४ ॥ ॥१५००॥

॥ घोंगड्याचे अभंग॥

ठकिलेकाळामारिलीदडी॥ दिल्हीकुडीटाकोनी ॥ १ ॥ पांघरलोंबहुकाळें॥ घोंगडेंबळेंसांडवलें ॥ २ ॥ नयेऐशालागावरी ॥ परतेदूरीलपाले ॥ ३ ॥ तुकाह्मणेआडेसेवा॥ लाविलाहेवाधांदली॥४॥ ॥१५०१॥
घोंगडियांचापालटकेला॥ मुलामुलींआपुल्यांत॥१॥ काह्मोबातोमीचदिसें ॥ लाविलेंपिसेंसोंगडियां ॥ २॥

तोबोलेमीउगाचिबैसें ॥ अनारीसेनदीसे ॥ ३ ॥ तुका
ह्मणेदिल्हेंसोंग ॥ नेदीय्यंगजाऊंदेऊं ॥ ४ ॥ १५०२ ॥
खेळोंलागलोंसुरकवडी ॥ माझिघोंगडीहारपली ॥ १ ॥
कान्होबाचेपडिलोंगळां ॥ घेईगोपाळादेझाडा ॥ २ ॥
मीतोहागेउघडाझालों ॥ अवघ्याआलोंबाहेरी ॥ ३ ॥
तुकाह्मणेबुद्धिकाची ॥ नाहींठाईचीमजपासीं ॥ ४ ॥
॥ १५०३ ॥
घोंगडियाचीयेकराशी ॥ त्याचपाशींतीहिहोती ॥ १ ॥ मा
झीयाचामागदावा ॥ केलागोवाउगवोंघा ॥ २ ॥ व्हा
वेंएसेंनिसंतान ॥ घेईआनतुजपासीं ॥ ३ ॥ तुकाह्मणे
लाहानमोठा ॥ सांडाताठाहादेवा ॥ ४ ॥ ॥ १५०४ ॥
नाहींतुझेउगापडतगळां ॥ पुढेंगोपाळाजाऊंनको ॥ १ ॥
चाहाडतुझेदावीनघरीं ॥ बोलण्याउरीनाहींऐसी ॥ २ ॥
तुह्माआह्मापडदाहोता ॥ सरलाआतांसरोवरीं ॥ ३ ॥ तु
काह्मणेउरतीगोठी ॥ पडिलीमीठीनसुटे ॥ ४ ॥ १५०५ ॥
तुह्माआह्माउरितोंवरी ॥ जनाचारीआहेतैसी ॥ १ ॥
माझेंघोंगडेंटाकुनिदेई ॥ येकेठाईमगअसो ॥ २ ॥ वि
रोधानेंपडेतुटी ॥ कपटपोटींनसावें ॥ ३ ॥ तुकाह्मणेतूं
जाणताहरि ॥ मजवेव्हारींबोलविसी ॥ ४ ॥ १५०६ ॥
मूळिचातुह्मालागलाचाळा ॥ तोगोपाळानसंडावा ॥
॥ १ ॥ घ्यावेंत्याचेंदेणेंनाहीं ॥ येचिवाहिदेखतसों ॥ २ ॥
माझीतरिघोंगडीमोठी ॥ गांडीचीलंगोटीसोडिसना ॥
॥ ३ ॥ तुकाह्मणेम्यासोडिलीआशा ॥ हुंगिलाफांसाये

थुनियां॥ ४ ॥ ॥ध॥ ॥ध॥ ॥ १५०७॥

घोंगडियासीघातलीमिठी॥ नसोडिसाठीकेलीजिवें ॥
॥ १ ॥ हागेचोरधराकोण्ही ॥ घरांतराहाटेचहूंकोनी ॥
॥ २ ॥ नोळखवेम्यांधरिलाहातीं ॥ देहादीपमायलावि
लीवाती ॥ ३ ॥ नपळेधांवणेंमारितोंचिहाका ॥ जना
चारितुकानागवला॥ ४ ॥ ॥ १५०८ ॥

आतांदेवापांघरोंकाई ॥ भीकेचेंतेंहिउरेचिना ॥ १ ॥ स
दैवदुबळेंनेणेचोर ॥ देखोनीसुनाटफोडितोघर ॥ २ ॥
नाहींमजपासींफुटकीकवडी ॥ पांचानीघोंगडीदिल्ही
होती॥ ३ ॥ तुकाह्मणेजनावेगळेंझालें ॥ येकचिनेलेंये
कल्याचें॥ ४ ॥ ॥ १५०९ ॥

मीमाझेंकरितहोतोंजतन॥ भीतरत्याचोरेंघेतलेंखाण ॥
॥ १ ॥ मजआल्यावीणआधींचतोहोता ॥ मजनकळ
तांमजमाजी॥ २ ॥ घोंगडेंनेलेंघोंगडेंनेलें॥ उघडेंकेलें
उघडेंचि॥ ३ ॥ तुकाह्मणेचोरटाचिझालासाव ॥ सहज
न्यावनाहींतेथें॥ ४ ॥ ॥ १५१० ॥

घोंगडेंनेलेंसांगोंमीकोणा ॥ दुबळेंमाझेंनाणितीमना
॥ १ ॥ पुढेंतेंमजनमिळेआतां ॥ जवळीसत्तादामनाहीं
॥ २ ॥ शेटेमहाजनऐकाकोणी ॥ घोंगडियाचीकराशो
धणी॥ ३ ॥ घोंगडियाचाकराबोभाट ॥ तुकाह्मणेजव
भरलाहाट॥ ४ ॥ ॥ १५११ ॥

माझेंघोंगडेंपडिलेंठाईं॥ मागतयापाईंसांपडला॥ १॥
चोरतोभलाचोरतोभला ॥ पाठिसीघातलापुंडलीकें ॥

॥ २ ॥ चोरकुठोरियेकेचिठाई ॥ वेगळेंपाहावेंनलगेकां
हीं॥ ३ ॥ आणिकाचिहीचोरिलीआधीं ॥ माझेंतयाम
धींमेळवीलें ॥ ४ ॥ आपल्याआपणशोधिलीतिहीं॥
करिनमीहीतेचीपरी॥५॥ तुकाह्मणेमाझेंहीतेंचिझालें॥
फाटकेंजाउनीधडकेंआलें॥ ६ ॥ ॥ १५१२ ॥
सर्पभुलोनीगुंतलानादा॥ गारोडियेफांदाघालीतसे ॥
॥ १ ॥ हिंडवोनिपोटभरिदारोदारीं॥कोंडोनीपेटारीआ
सेरया॥ २ ॥ तैसीपरिमजझालीपांडुरंगा ॥ गुंतलोंमी
गासोडींआतां ॥ ३ ॥ माझेंमजकांहींनलगेसेझालें ॥
कृपाहेभलेंतूनकरितां॥४॥ आमिषानेमीनलावीयेला
गळीं ॥ भक्षतोगीळीह्मणवोनी ॥ ५ ॥ काढुनीबाहेरि
प्राणघेऊंपाहे॥ तेथेबापमायकवणतया ॥ ६ ॥ पक्षी
पिलीयांपातलेआशा॥देखोनीयाफांसागुंतेबळें॥ ७॥
मरणनेणेसायासेंधावोनिवोरसें ॥ जिवीत्वानाशझा
लींबाळें॥ ८ ॥ गोडपणेंमासीगुंतलीलिगाडी॥ सांपडे
फडफडीअधिकाधीक॥ ९ ॥ तुकाह्मणेप्राणघेतलाया
आशा॥ पंढरीनिवासाधांवघालीं॥१०॥ ॥१५१३॥
यातिहीनमजकायतोअभिमान॥ मानीतुजजननारा
यणा॥१॥ कायसुखमजतयाचियेखंती॥ आपुलाला
घेतीगुणभाव॥ २ ॥ द्रव्यामुळेंमाथावाहियेलीचिंधी॥
होताजयामधींहोनगांठी॥ ३॥ तुकाह्मणेजनवंदितोवे
गळा॥ मजसीदुर्बळाकायचाड॥४॥ ॥१५१४॥
सितळसाउलीआमुचिमाउली ॥ विठाईवोळलीप्रेम

पाहा ॥ १ ॥ जाउनिवोसंगारिघेनवोरसे ॥ लागेलतें इच्छेपिइनवरी ॥ २ ॥ रूपातनुमाझीसांभाळादुहोनी ॥ अमृतजिवनींलोटलीसे ॥ ३ ॥ आनंदाचाठावनाहींमा माझेचित्तीं ॥ सागरतोकितीउपमेसी ॥ ४ ॥ सैरजाय पडेतयासीसांकडें ॥ सांभाळावेंपुढेंमागें असें ॥ ५ ॥ तुकाह्मणेचिंताकैसीतेमीनेणें ॥ लडिवाळतान्हेंविठाईचें ॥ ६ ॥ ॥ १५१५ ॥

रामावनबास ॥ तेणेवसेसर्वदेश ॥ १ ॥ केलेंनामाचेजतन ॥ समर्थतोनव्हेभिन्न ॥ २ ॥ वनांतरींरडे ॥ ऐसेपुराणींपवाडे ॥ ३ ॥ तुकाह्मणे ऋषीनेम ॥ ऐसाकळोनिकांभ्रम ॥ ४ ॥ ॥ १५१६ ॥

रामह्मणेग्रासोग्रासीं ॥ तोजेवीलाउपवासी ॥ १ ॥ धन्यधन्यतेंशरीर ॥ तीर्थाव्रताचेंमाहेर ॥ २ ॥ रामह्मणेकरितांधंदा ॥ सुखसमाधित्यासदां ॥ ३ ॥ रामह्मणेवाटचाली ॥ यज्ञपाऊलापाऊलीं ॥ ४ ॥ रामह्मणेभोगीत्यागी ॥ कर्मनलिंपेत्याच्याअंगीं ॥ ५ ॥ ऐसारामजपेनित्य ॥ तुकाह्मणेतोजीवन्मुक्त ॥ ६ ॥ ॥ १५१७ ॥

तारिऐसेजड ॥ उदकावरिजोदगड ॥ १ ॥ तोहानकरीतेंकाई ॥ कांरेलीनव्हानापाईं ॥ २ ॥ शिळाहोतीमनुष्यझाली ॥ ज्याच्याचरणाचेचाली ॥ ३ ॥ वानराहातींलंका ॥ घेववीलीह्मणेतुका ॥ ४ ॥ ॥ १५१८ ॥

रामह्मणतांरामचिहोई ॥ पदिंबैसोनीपदवीघेई ॥ १ ॥ ऐसेंसुखवचनींआहे ॥ विश्वासेंअनुभवपाहे ॥ २ ॥ रा